मार्च १९७३





अमरवाणी

घृतेन वर्द्धते बुद्धिः,
क्षीरे आयुष्य वर्द्धनम्,
शाकेन वर्द्धते व्याधिः,
मांसम् मांसेन वर्द्धते । ॥ १ ॥

[तुपाने बुद्धीचा विकास होतो, दुधाने आयुष्य वाढते, भाजीपाल्याने व्याधी वाढते आणि मांस मांसाने वाढते.]

अनभ्यासे विषम् शास्त्रम्
अजीर्णे भोजनम् विषम्,
दरिद्रस्य विषम् गोष्ठि,
वृद्धस्य तरुणी विषम् । ॥ २ ॥

[अभ्यासाशिवायचे शास्त्रज्ञान, अजीर्ण झाले असतां जेवण, दारिद्र्यात मनोरंजनार्थ नत्य नाटक, तमाशे इत्यादी आणि उतारवयात तरुणीचा संग, हे सर्व हितकारी नसतात.]

वृथा वृष्टि ससमुद्रे च,
वृथा तृप्तेच भोजनम्,
वृथा धनवतो दानम्,
दरिद्रे यौवनम् वृथा । ॥ ३ ॥

[समुद्रावर पाऊस आणि पोट भरले असतां जेवण, तसेच धनवानाला दान देणे आणि दारिद्र्यात यौवन व्यर्थ होय !]



अग्नि परीक्षा

पुरंदर राज्याची राजकन्या लावण्यवती नावासारखीच सुंदर होती. तिचे रूप म्हणजे अप्सरादेखील माना खाली घालतील इतके सुंदर होते. योग्य वर मिळाल्यावर राजकन्येचा विवाह करून देण्याचा विचार राजा करीत होता. परंतु पुरंदर राज्य दूर डोंगराळ प्रदेशात होते. चारी बाजूला मोठे जंगल होते. म्हणून त्या देशात जावयाचे झाल्यास कित्येक दिवस लागत. म्हणून लावण्यवतीसाठी योग्य वर मिळायला फार उशीर झाला.

लावण्यवतीला सुद्धां करमेनासे झाले होते. तिचा लवकर विवाह करून द्यावा असे सर्वांना वाटत होते. खेळायला मैत्रिणी व दासी होत्या. परंतु त्यात किती दिवस आनंद मिळणार? तिच्या दासी तिच्या मनोरंजनार्थ गोष्टी व कथा सांगत. परंतु त्याच त्याच गोष्टीच त्यांना सांगाव्या लागत. त्यामुळे राजकुमारीला राजवाड्यातले राहणे नकोसे वाटू लागले.

एक दिवशी ती कोणाला काही सांगितल्याशिवाय आणि कळू दिल्याशिवाय राजवाड्याबाहेर निघून गेली आणि जंगलात उत्तर दिशेला चालत असतां ती एका अत्यद्भुत उद्यानात येऊन पोचली. त्या उद्यानात जिकडे पहावे तिकडे सुंदर वृक्ष, लता व फुले आणि फळे दिसत होती. तसले वृक्ष व लता आणि फुले लावण्यवतीने आयुष्यभरात कधी पाहिली नव्हती. ते उद्यान मानव निर्मित दिसत नव्हते. तेथे माणसांची येजा पण दिसत नव्हती. तिला कोठे पशुपक्षी सुद्धा दिसले नाहीत. अगदी अपूर्व असे ते उद्यान होते.

लावण्यवती प्रत्येक फुलझाडाजवळ जाऊन फुलांचे सौंदर्य आणि वास पहात त्यांचे कौतुक करीत होती. एका झाडाचे



फूल तिला फारच आवडले आणि ते तोडून घेऊन वेणीत खोवून ठेवावेसे तिला वाटले. तिचा हात फुलाजवळ गेला.

"कोण तोडते आहे ते फूल?" असे म्हणत एक तरुण युवक झाडाआडून लावण्यवतीसमोर आला. परंतु तिला पाहून त्या तरुणाच्या मनात बदल झाला. तो काही बोलणार, पण त्याच्या तोंडातून एक शब्द ही उमटला नाही. तो लावण्यवतीचे सौंदर्य पाहून अवाक् झाला होता आणि आश्चर्यचकित होऊन तिच्याकडे कौतुकाने पहात होता.

"मला फूल तोडायला मनाई आहे, हे माहीत नव्हते. परवानगी विचारावी तर ... कोणी दिसले नाही. मला वाटले की येथे कोणी नाही." लावण्यवती म्हणाली.

तो तरुण स्मित करून म्हणाला—"येथे कोणी खरोखरच रहात नाही. फक्त मी एकटा पाहरा देण्यासाठी राहतो." असे म्हणत त्याने झाडावरची काही फुले तोडून लावण्यवतीला दिली.

"फूले तोडायला मनाई असल्याचे आतांच आपण नाही का सांगितले?" लावण्यवतीने विचारले.

"तुझ्या सारख्या सुंदरीकरितां तो नियम नाही." तो तरुण म्हणाला.

"आपण कोण?" तिने विचारले.

"माझे नाव सुव्रत आहे. मी गंधर्वांच्या या उद्यानाचा पाहरेकरी आहे." तो म्हणाला.

लावण्यवतीला गंधर्वांचे नांव ऐकून थोडी भीती वाटली. कारण मानवांना त्यांची मैत्री आणि सख्य घातुक असते. ते अनेक मंत्रविद्यांत प्रवीण असतात. लावण्यवतीला कदाचित माहीत नव्हते की गंधर्व तिच्या राज्याच्या इतक्या जवळ राहतात.

लावण्यवतीला भ्यालेली पाहून सुव्रत म्हणाला—"राजकुमारी! भिण्याचे मुळीच कारण नाही. मी गंधर्वांचा सेवक असलो तरी जन्माने तुझ्यासारखाच एक मानव आहे. माझे आजोबा पूर्वेकडील जयसिंधु देशाचे महाराज आहेत. लहानपणीच माझे ... आजोळी जाऊन राहू लागलो. तेथेच मी लहानाचा मोठा झालो. मोठा झाल्यावर मी आजोबांबरोबर या जंगलात शिकारी साठी आलो. तेव्हां एक गंधर्वांची राणी मला पकडून इकडे घेऊन आली. तिला वाटत होते की मी तिच्याशी लग्न करीन. परंतु तिच्यावर माझे प्रेम नव्हते. म्हणून तिने दिवसां मला या उद्यानाची राखण करण्याचे काम दिले. रात्री ती मला धरून गंधर्व लोकात घेऊन जाते. मला गंधर्वांची राहणी आणि त्यांचा देश मुळीच आवडत नाही. दिवसेदिवस माझ्या मनांत गंधर्व लोकाचा तिटकारा वाढतच गेला. या जाळ्यातून कशी सुटका होते हे मी पहात होतो. आजपर्यंत मला मानव जातीचा कोणी भेटलाच नाही आणि मी अगदी निराश झालो आहे." असे म्हणत त्याने मोठ्या दुःखाने सुस्कारा सोडला.

लावण्यवती त्या तरुणाकडे टक लावून पहात होती. आपली सहानुभूति दर्शवून ती त्याला म्हणाली—"उपाय आहे का काही सुटण्याचा? माझ्याकडून होऊ शकला तर मी प्राणपणाने तो करीन."

सुव्रत लावण्यवतीकडे, तिच्याकडून होऊं शकेल का अशा संदिग्ध मुद्रेने पहात म्हणाला—"दर पौर्णिमेला गंधर्व राणी आपल्या दासदासी व सखींबरोबर या उद्यानात विहार करायला येते. त्यावेळी मला तिच्याबरोबर रहावे लागते. परंतु त्यावेळी





कोणी मानवाने मला घट्ट आवळून आलिंगन करून धरून ठेवले आणि गंधर्वराणीने माया करून किती त्रास दिला आणि भीती दाखविली तरी मला सोडले नाही तर मला गंधर्वराणीच्या या "तुरुंगवासातून" सुटका मिळू शकेल. परंतु माझ्या करितां इतके कष्ट सहन करणाऱ्याच्या मनात माझ्याविषयी तितकीच आपुलकी असली पाहिजे. परंतु मला ओळखणारा या जगतात कोणी असेलसे मला वाटत नाही. तेव्हां माझी सुटका होऊं शकेल असा विचार करणे म्हणजे माझा मूर्खपणाच आहे."

सुव्रतने मोठ्या कष्टाने हे सर्व सांगितले व पुढे म्हणाला—"सूर्यास्ताची वेळ आहे [illegible] आहे. काळोख पडल्यावर या उद्यानात राहणे धोक्याचे आहे."

"तुला लवकरच गंधर्वांच्या या 'तुरुंगातून' सुटका मिळेल!" असे सांगून लावण्यवती घाईघाईने परतली.

पौर्णिमा व्हायला चार दिवस होते. लावण्यवतीच्या मनात सुव्रतचाच विचार येई. तिला दुसरे काही सुचत नव्हते. तिने त्याचे रक्षण करण्याचा आणि त्या प्रयत्नात प्राण गेला तरी पाय मागे न घेण्याचा निश्चय केला.

पौर्णिमेला लावण्यवती एकटी कोणाला काही सांगितल्याशिवाय गंधर्वांच्या उद्यानात आली. ती त्या दिवशी मुद्दाम काळी साडी नेसून आली होती. झाडांच्या सावलीत कोणाला ती दिसली नाही. ती झाडाझुडपाआड लपून बसली. तिने आपल्या काळ्या थोर केसांखाली आपले चंद्रासारखे स्वच्छ तोंड लपवून ठेवले.

रात्री उद्यानात कोणी चालल्याचा आवाज ऐकू येऊ लागला. गंधर्व जोडपी एकेक करून येऊ लागली. झुडपाआडून लावण्यवती प्रत्येक जोडपे पहात होती.

मध्यरात्रीच्या सुमारास सुव्रत एका स्त्रीबरोबर येताना दिसला. ती स्त्री गंधर्व राणीच असणार हे ओळखायला लावण्या- [illegible] जवळ आल्याबरोबर लावण्यवती झुडपाआडून बाहेर आली आणि तिने सुव्रतला घट्ट आवळून आलिंगन केले.

गंधर्व राणी थक्क होऊन तिच्याकडे पाहू लागली. आतां सुव्रत आपल्या हातातून निसटणार की काय अशी शंका तिच्या मनात आली. म्हणून तिने आपली माया सुरू केली.

लावण्यवतीने सुव्रतला आवळून धरले होते परंतु त्याच्या जागी एक बलिष्ठ अजगर तिला दिसला. तिने न कचरता त्या अजगराला तसेच पोटाशी आवळून धरून ठेवले. अजगराचा सिंह झाला. सिंहाला पाहून लावण्यवती दचकली, परंतु ती सावध होती. तिने आपली पकड थोडीदेखील सैल केली नाही. इतक्यात त्या सिंहाच्या जागी विस्तवात तापवलेली एक लाल पहार झाली. लावण्यवतीच्या अंगाचाभडका उडाला. तरी तिने दांतओठ आवळून ते सहन केले आणि पहार आवळून पोटाशी धरून ठेवली.

त्यानंतर काय झाले तिला कळले नाही. ती शुद्धीवर आली तेव्हां उद्यानात एकही गंधर्व नव्हता. ती सुव्रताला आवळून पोटाशी धरून होती. सुव्रतदेखील तिच्या पाठोपाठ शुद्धीवर आला.

"तू गंधर्व राणीपासून माझे रक्षण केलेस. तुझ्या या ऋणाची फेड कशी होईल, मला सांगता येत नाही. चल, आपण प्रथम तुझ्या गावी जाऊ. तुला तुझ्या घरी पोंचविल्यावर पुढे काय करायचे याचा विचार मी करीन." सुव्रत म्हणाला.

राजकुमारी अदृश्य झालेली पाहून राजवाड्यात व जवळपासच्या जंगलात तिचा शोध सुरू झाला. सर्व लोक काळजीत होते. परंतु लावण्यवतीने घरी पोंचल्यावर घडलेले वृत्त थोडक्यात सांगितले. राजा सुव्रतला म्हणाला—"तुझ्यासाठी माझ्या मुलीने अग्नि दिव्य करून दाखविले आहे. तेव्हां तुझ्याशिवाय तिचा विवाह आम्ही आणखी कोणाशी करणार?"

दोघांचा विवाह सुमुहूर्तावर झाला.



अस्पृश्य

कावेरी नदीच्या काठी एका गावी कांचनशर्मा नावाचा एक कर्मठ ब्राह्मण रहात असे. तो स्वभावाने फार रागीट होता. त्याच गावी माधव नावाचा एक महार होता. तो स्वभावाने शांत होता आणि ज्ञानीपण होता.

चंद्रग्रहण होते गावकरी मंडळी पहाटे उठून कावेरी नदीवर स्नानाला गेली होती. कांचनशर्मा स्नान करून आपल्या घरी परत येत होता. तेव्हां माधवचे ओले कपडे कांचनशर्मांच्या अंगाला लागले. माधवला ते कळले नाही.

कांचनशर्माचा पारा एकदम चढला. दात ओठ चावून त्यांनी माधववर शिव्यांची लाखोली वाहली. माधवने चुकीची माफी मागून अंधारात दिसले नाही, असे सांगितले. त्याने माफी मागून साष्टांग नमस्कारपण केला. परंतु कांचनशर्माचा पारा उतरला नाही. त्याने बिचाऱ्याला चारपाच लाथा मारून शिव्या दिल्या आणि महाराला शिवल्याच्या पापाबद्दल पुन्हा नदीवर जाऊन स्नान केले.

कांचनशर्माला पुन्हां नदीवर स्नानाला गेलेला पाहून माधव पण नदीवर गेला आणि स्नान करू लागला. तेव्हां कांचनशर्माने त्याला विचारले—"कायरे, तू शिवलास म्हणून मला स्नान करावे लागले, पण तू कशाला स्नान करतो आहेस ?"

माधव म्हणाला—"काम क्रोध आदि षडरिपू अस्पृश्यासारखेच मी मानतो. क्रोध रूपी अस्पृश्याचा स्पर्श झाला म्हणून मी पुन्हां स्नान करतो आहे."





यक्ष पर्वत

[८]

[खड्गवर्मा आणि जीवदत्त दोघांनी मांत्रिकाला व केसाळ भूताला खूप ठोकले आणि पडक्या इमारतीत शिरले. तेथे पुजारिणीच्या नोकरांनी त्या दोघांना कैद करून अंधार कोठडीत डांबून ठेवले. परंतु दोघांनी स्वतःची सुटका करून घेऊन शेजारच्या खोलीतल्या सिंहाला पुजारिणीच्या नोकरांवर सोडले. पुढे–]

उपाशी भुकेला सिंह पुजारिणीच्या नोकरांवर धांवला. त्याने एकेकाला घायाळ करून टाकले. खोलीभर नोकर अर्धमृतावस्थेत पडलेले होते. त्यांचा कोणी वाली नव्हता. सिंह वाटेल त्याला खाण्याच्या स्थितीत होता.

खड्गवर्मा व जीवदत्त सिंहाने चालविलेला तो धुमाकूळ पहात एका पडक्या-मोडक्या खिडकीत उभे होते. खड्गवर्मा हसत त्या नोकरांना म्हणाला—"काय रे! तुम्ही त्या बिचाऱ्या सिंहाला चारपांच दिवसात कधी खायला प्यायला घातलेले दिसत नाही. म्हणून आतां तो तुमच्यावरच आपली भूक भागवणार आहेसा दिसतो आहे. तरमग आतां पहिल्याने तुमच्यापैकी कोणीतरी पुढे या त्याचा आहार व्हायला, म्हणजे कदाचित तुमच्यातल्याच इतरांचा जीव तरी वांचेल!"



पुजारिणीचे नोकर ही थट्टा समजण्याच्या मन:स्थितीत नव्हते. कारण त्यांच्यापैकी चारपांच जणांना खड्गवर्माचे पुरे होण्यापूर्वीच सिंहाच्या पंजांचा तडाखा बसला होता. एकाला सिंहाने आपल्या जबड्यातच धरले होते. तो ओरडत होता. जे लोक पडक्या खिडक्यात चढून बसले होते ते थरथर कांपत होते. परंतु सिंहाची नजर त्यांच्यावर नव्हती. कारण तो वाट सांपडली तर जंगलात पळून जाण्याच्या विचारात होतासा दिसत होते. त्याने एकदां चारही बाजूंना नजर फिरवून पाहिले.

जीवदत्तने ते ओळखले आणि आपली कुबडी सिंहाला दाखवून म्हणाला–"हे [illegible] खाल्ले तर दुष्ट लागेल या भीतीने का तू मागेपुढे करतो आहेस? त्या पहा, बाजूला पायऱ्या आहेत. तू त्या वाटेने जा. पुढे तुला सर्व जंगल मोकळेच आहे." असे म्हणत जीवदत्तने, सिंह उभा होता तिकडे चार पावले टाकली आणि पायऱ्याकडे त्याने वळावे म्हणून त्याला कुबडीने खूण केली.

सिंहाने गुरगुरून त्याला कोणाचा असा हुकूम आवडत नाही असे दर्शविले आणि जीवदत्तवर उडी मारण्यासाठी मागच्या पायांवर उभा राहीला. परंतु जीवदत्तने आपली कुबडी चटदिशी त्याच्या पोटात मारली आणि त्याला जोराने बाजूला ढकलले. सिंह स्वत:ला सावरू न शकल्यामुळे तोल जाऊन खाली पडला आणि घसरत पायऱ्यापर्यंत जाऊन पोंचला.

जीवदत्त त्याला म्हणाला–"हे जंगलाच्या राजा! आता लवकर उभा रहा आणि पुजारिणी नोकरांबरोबर येण्यापूर्वी तू पाय काढ कसा! यातच तुझे हित आहे." जीवदत्त सिंहाला कुबडी दाखवीत चार पावले पुढे गेला.

पडक्या भिंतीवर बसून पुजारिणीचे नोकर जीवदत्तने सिंहाला कसा आडवा पाडला होता आणि त्याच्या हुकमाप्रमाणे [illegible] होते. त्यांना आश्चर्य वाटले, त्यांच्यापैकी एकाने हिंमत करून जीवदत्तला नमस्कार केला आणि म्हणाला–"हे मांत्रिक शिरोमणी! आपली मंत्रशक्ती सामान्य माणसाला अवगत होण्यासारखी नाही. आतां महाशक्ती पुजारिणीचा वध करून तूच या पडक्या नगरावर राज्य कां करीत नाहीस? आम्ही तुझे शिष्य होऊन तुझी सेवा करू. आम्हांला या दुष्ट पुजारिणीच्या अत्याचारांतून सुटका तरी मिळेल! एका बाईचे नोकर होऊन तिची 'हांजी' 'हांजी' करण्यापेक्षां एका पराक्रमी पुरुषसिंहाची सेवा करण्यात गौरव आहे."

त्याच्या तोंडचे ते वाक्य पुरे होण्यापूर्वीच त्याचे दोघे तिघे साथी "गुरुद्रोह, गुरुद्रोह!" म्हणत त्याला मारायला धावले. पडक्या भिंतीवरच त्यांची मारामारी सुरू झाली. एक दोघे पाय घसरून खाली येऊन पडले. पायऱ्यांकडे वळलेला सिंह दचकला आणि चवताळून त्याच्या अंगावर उडी मारायला मागे फिरला.

जीवदत्तने कुबडी दाखवून सिंहाला दरडावले–"तू पायऱ्या उतरून आपल्या वाटेने चालू लाग. तू पुजारिणीच्या शिष्यांच्या भांडणात पडून स्वत:चा जीव धोक्यात घालून घेऊ नकोस!"



सिंहाला कुबडीचा तडाखा एकदा कळला होता. म्हणून जीवदत्तने कुबडी दाखविल्यावर सिंह, रागाने गुरगुरतच का होईना पायऱ्या होत्या त्या बाजूची खोली पार करून निघून गेला.

खड्गवर्मा हे सर्व दृश्य इतका वेळ मुकाट्याने पहात होता. आतां मात्र त्याला राहवले नाही. म्हणाला–"जीवदत्त! आपण तरी येथे कशाला थांबायचे? पुजारिणीचे शिष्य आपसात मारामारी करीत आहेत. आपल्याला अडवायला येथे कोणी नाही. आपण देखील या पडक्या नगरातून पाय काढला तर काय हरकत आहे?"



"ठीक! चल तर सिंह गेला त्याच वाटेने आपण जाऊ या. कदाचित गुहेचे दार आपल्याला मिळेल." असे म्हणत जीवदत्त निघाला.

परंतु खड्गवर्माचे म्हणणे खोटे ठरले. त्यांना अडविणारा कोणी नाही असे त्याला वाटत होते. परंतु पुजारिणीला तिच्या एका विश्वासू नोकराकडून जीवदत्त व खड्गवर्मा सुटल्याची गोष्ट कळली होती आणि सिंहाने तिच्या काही नोकरांना घायाळ केल्याचे पण कळले होते.

ते कळल्यावर पुजारिणी संतापाने म्हणाली–"हे महाभूता! हे रे कसे झाले? म्हातान्या पुजान्यासारख्याला सुद्धा मी आपल्या मंत्रबळाने कैद करून अंधार कोठडीत डांबून ठेवले आहे. अशा माझ्या-सारख्या महाशक्ती विरुद्ध दोघे सामान्य मानव दंड ठोकून कसे उभे आहेत? माझ्याच राज्यात शिरून माझ्या शिष्यांना व नोकरांना घायाळ करणारे हे कोण आहेत, मला पहावयाचे आहे. मूर्ख पळपुट्यांनो आम्हांला दाखवा तरी ते दोघे मानव कोठे आहेत? मी त्यांच्या समाचाराला येणार आहे. मी स्वतः त्यांना कैद करते."

पुजारिणीच्या दोघां शिष्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी जीवदत्ताचा प्रताप पाहिला होता. खड्गवर्मा व जीवदत्त दोघांनी मांत्रिकाला व केसाळ भुताला कसे लोळविले होते आणि सिंहालादेखील कसे पळवून लावले होते हे पाहल्यामुळे पुजारिणीच्या मंत्रबळावरचा त्यांच्या मनात होता नव्हता तो विश्वास ढळला होता. म्हणाले–"हे महाशक्ती पुजारिणी! ते दोघे फक्त मानव नसून शक्तिशाली मांत्रिक आहेत. त्यांनी आप-ल्या दरबारी मांत्रिकाला आणि केसाळ भुताला..."

त्याच्या तोंडातले ते वाक्य पुरे होण्या-पूर्वी पुजारिणीने आपल्या भाल्याचे टोक त्याच्या पाठीवर ठेवले व चवताळलेल्या वाघिणीसारखी म्हणाली–"तोंडाची बडबड बंद कर! मी त्या दोघांना आत्ता कैद करते आणि महाभूतासमोर त्यांना बळी देते., हो बाजूला!" असे म्हणत ती पुढे सरसावली.

नोकर भीतभीतच पुढे निघाले. त्या सर्वांच्या पुढे मांत्रिक व केसाळ भूत स्वतःला सावरून चालू लागले.

"गुरुवर्य! या खेपेस मी त्या दोघांना खाऊन टाकतो पहा!" केसाळ भूत म्हणाले.

"अरे! असला वेडेपणा करायला जाऊ नकोस. तू चुकतो आहेस. हे दोघे सामान्य मानव नाहीत, लक्षात ठेव! हे आपल्या नगरात शिरले आहेत ते पुजारिणीचा पराभव करणार, नक्की, पहा! नंतर मी या नगराचा राजा होणार व तू माझा मंत्री. आपण त्या म्हातान्या मांत्रिकाला बंदीमुक्त करून त्याच्याजवळ आणखी मंत्र शिकून घेऊ या." मांत्रिकाने केसाळ भूताला ही गोष्ट हळूच फक्त त्याला ऐकू जाईल एवढ्या स्वरात सांगितली.

केसाळ भुताला ते ऐकून फार आनंद झाला. मागे वळून तो म्हणाला–"गुरुवर्य! तुम्ही महाराज आणि मी मंत्री म्हणतां? वाः! छान छान!"

पुजारिणी आणि तिचे इतर शिष्य व नोकर बरेच पाठीमागून चालत होते.



पुजारिणीने त्या सर्वांना सर्व पडके नगर पालथे घालून त्या दोघांना पकडून समोर हजर करण्यास सांगितले. परंतु त्यांच्या दुर्दैवाने खड्गवर्मा व जीवदत्त फार दूर नगराच्या दुसऱ्याच भागात होते आणि नगराबाहेर पडले होते. ते परत जंगलात जाण्यासाठी वाट शोधीत होते. परंतु भुयारातल्या ज्या वाटेने ते आले होते ती वाट त्यांना सापडत नव्हती. परंतु ती गोष्ट पुजारिणीच्या लोकांना माहीत नव्हती.

"खड्गवर्मा! आपण ज्या वाटेने आलों होतो त्या वाटेने बाहेर निघता येईलसे दिसत नाही. पुजारिणीच्या शिष्यांपैकी



एखाद्याला पकडून त्याच्या मदतीनेच बाहेर निघावे लागेल. दुसरा उपाय आत्ता उरला नाही." जीवदत्त म्हणाला.

"मला वाटते, पुजारिणीच्या शिष्यांना चकवून आपण पुष्कळ दूर निघून आलो आहों आणि तो सिंह कोठे गेला कळले नाही. तो या पडक्या नगराबाहेर जंगलात तर पोचला नसेल अशी एक शंका मला आहे!" खड्गवर्मा म्हणाला.

"नाही मला वाटते, तो आपल्या सारखाच वाट चुकून कोठेतरी अडकून राहला असावा. त्याच्या गर्जना तुला नाही का ऐकू येत?" असे म्हणत जीवदत्तने पडक्या भवनाच्या खिडकीत डोकावून पाहून आणि म्हणाला—"खड्गवर्मा! इकडे ये. ती पहा धान्याची पोती! व्यापाऱ्यांना लुटून यांनी ही पोती एकत्र केली आहेत. हे त्यांचे कोठार आहे. हाच यांचा धंदा दिसतो आहे तर!"

खड्गवर्माने पण खोलीत डोकावून पाहिले, एकावर एक धान्याची पोती रचून ठेवलेलीं होती. काही पोती फाटलेली होती आणि त्यांतून गहू, तांदूळ, ज्वारी व बाजरी बाहेर पडत होती.

याचा अर्थ असा की या केसाळ भुताच्या मदतीने बिचाऱ्या व्यापाऱ्यांना लुटून या लोकांनी ही धान्याची पोती जमा केली आहेत. पुजारिण मोठी वस्ताद दिसते आहे. हे सर्व कृत्य तिचेच दिसते आहे!" खड्गवर्मा म्हणाला.

"या धान्याच्या कोठारातला एक दाणा देखील तिच्या हाती लागतां कामा नये, अशी काही तरी युक्ती आपण काढली पाहिजे. तेव्हां या लोकांना ही त्यांची लपण्याची जागा सोडून बाहेर यावे लागेल. नाहीतर उपाशी मरावे लागेल." जीवदत्त म्हणाला.

"तुझ्या व माझ्या मनात एकच विचार एकाच वेळी आला आहे! आहे की नाही गंमत?" खड्गवर्मा असे म्हणत हंसला. त्याने आपल्या खिशातून दोन गारगोट्या



काढल्या आणि कापसावर ठिणग्या पाडून तो पेटवला. त्याच्या मदतीने त्याने मोठा जाळ तयार करून कोठारालाच आग लावली.

खड्गवर्मा व जीवदत्त बाहेर उभे राहून ते दृश्य पहात होते. हळूहळू सर्व पोत्यांना आग लागली आणि लाह्या फटफट फुटू लागल्या आणि वाऱ्याने बाहेर येऊन पडू लागल्या.

"अरे पण या लाह्या खाऊन हे लोक या पडक्या इमारतीत काही दिवस मजेत काढतील नाही का वाटत तुला?" खड्गवर्मा म्हणाला.


"थोडा वेळ थांब! पहा सर्व जळून राखेचा ढिगारा तेवढा उरेल. परंतु हा जाळ आणि आगीचे लोट पाहून पुजारिणी व तिचे नोकर सावध होऊन इकडे धावतील. तेव्हां..."

जीवदत्त असे म्हणत असतां कोठाराच्या बाजूच्या खोलीतून कोणीतरी ओरडत असल्याचे ऐकू आले.

"[illegible]र्मा! बा[illegible]च्या [illegible] कोणी-त[illegible]डकला आहे आणि [illegible] बिचारा या आगीत मरणार की काय अशी भीती वाटते आहे." असे म्हणत जीवदत्त घाई-घाईने धावत त्या खोलीच्या जवळ गेला जोराने धक्के मारून दार उघडण्याचा यत्न करू लागला.

खड्गवर्मा त्याच्या जवळ जाऊन हंसत म्हणाला–"जीवदत्त! या गडबडीत तू दाराला कुलूप लावले आहे ते पाहिले नाहीससे दिसते. तू आपल्या कुबडीने प्रथम ते कुलूप फोड!"

जीवदत्तने वेळ न दवडता कुबडीने कुलूप फोडले आणि कडी काढून दार उघडले. खोलीत तेवढा काळोख नव्हता. एका खिडकीतून थोडा उजेड येत होता. त्या उजेडात भिंतीत ठोकलेल्या खुंट्यांना बांधलेल्या साखळदंडांनी एका आजानुबाहू हडकुळ्या म्हाताऱ्याला जखडून ठेवलेले होते. त्याची पांढरी लांब दाढी वाऱ्याने हलत होती. (क्रमशः)






आयुर्दान

विक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो झाडाजवळ गेला, प्रेत खांद्यावर काढून घेतले आणि नेहमीप्रमाणे मौनपणे स्मशानाच्या दिशेने चालू लागला. तेव्हां प्रेतात बसलेला वेताळ त्याला म्हणाला–"राजा! फार पूर्वी माधव नावाचा एक मनुष्य परक्यांसाठी पुष्कळ कष्ट सहन करून त्यांना मदत करीत असे. परंतु तो आपल्या नातेवाइकांना मदत करीत नसे. तू देखील तसाच इतरांसाठी इतके कष्ट सहन करीत नाहीस ना? तुला त्याची गोष्ट मी सांगतो." असे सांगून वेताळ गोष्ट सांगू लागला.

पिनाकिनी नदीच्या काठी माधव नावाचा एक श्रीमंत कुटुंबातला तरुण युवक रहात असे. अत्यंत प्रेमाने लाडात त्याचे पालन झाले होते. म्हणून लहानथोर संकटांना तोंड द्यायला तो घाबरत असे. गुरुगृही राहून



विद्याभ्यासाचे कष्ट सहन करण्यास ही त्याची तयारी नव्हती. म्हणून तो अशिक्षितच राहिला. जमीनजुमला भरपूर होता म्हणून त्याच्या आईवडिलांनी त्याच्या विद्याभ्यासाकडे दुर्लक्ष केले.

माधव लग्नाला योग्य झाला तेव्हां त्याला आपण शहरात रहावेसे वाटू लागले. त्याने आपल्या आईवडिलांना सांगून व त्यांचे मन वळवून सर्व जमीनजुमला विकून टाकला आणि सर्व धन घेऊन विक्रमसिंहपुरीला आला. तेथे त्याने एक चांगलेसे घर विकत घेतले आणि उरलेल्या भांडवलावर व्यापार करण्याचे ठरविले. त्यासाठी त्याने पुष्कळसा माल विकत घेतला.

[illegible] दुर्दैवाने [illegible] त्याचे घर जळून गेले आणि त्या जागी उरला तो राखेचा मोठा ढिगारा. माधवने कसाबसा आपला जीव वांचविला. परंतु त्याचे आईवडील त्या अपघातात मरण पावले. त्याने व्यापारासाठी घेतलेला सर्व मालदेखील जळून भस्म झाला. माधव राजाचा रंक झाला.

माधवने जीव द्यायचे ठरविले आणि पिनाकिनी नदीवर गेला.

त्या अंधारात ही त्याला एका झाडाखाली बसलेल्या माणसाने विचारले–"मुला, कोण तू? आणि काय करण्याच्या विचारात आहेस?"

माधव त्या झाडाजवळ गेला. तेथे त्याला एक मुनी दिसले. आपल्या दुर्दैवाची कथा सांगण्याचा विचारात माधव असता ते मुनी म्हणाले–"अरे, ते सर्व मला माहीत आहे, या जगात जगायचे कसे हे तुला माहीत नसल्यामुळे जीव द्यायचा विचार करून तू नदीकाठी आलास. परंतु तुझा हा प्रयत्न फुकट आहे."

"असे कां म्हणतां मुनीश्वर?" माधवने विचारले.

"तुला देवाने शंभर वर्षे आयुष्य दिले आहे. ते पूर्ण होईपर्यंत मृत्यू तुझ्या देहाला हात लावणे शक्य नाही." मुनी म्हणाले.

[illegible] वाईट वाटले व त्याने घाबरून जाऊन विचारले–"परंतु काय हो? एक वेळचे जेवण मिळविण्याची लायकी नसता मी शंभर वर्षे जगायचे कसे? मला नरकयातनाच भोगाव्या लागतील!"

मुनींनी थोडा वेळ विचार केला आणि म्हणाले–"पैशाशिवाय जगणे तुला अशक्य वाटते का? मी तुला सांगतो पैसे कसे मिळवायचेते. मेलेल्या माणसांना तू आपल्या आयुष्यातला काही काळ दिलास तर ते पुन्हां जिवंत होतील व तुला खूप पैसे देतील. आपले आयुष्य विकून तुला वाटेल तितके पैसे मिळवितां येतील. परंतु तू जितके आयुर्दान करशील तितके तुझे आयुष्य पण कमीकमी होत जाईल."

माधवने विचार केला की मुनीश्वर म्हणतात ते खरे आहे. त्याच्या आयुष्याचा प्रश्न सुटेल. असा विचार करून त्याने त्या मुनींकडून मंत्रोपदेश घेतला आणि आपल्या आयुष्यातली काही वर्षे दान करीत जगण्याचा उपक्रम करू लागला.


सकाळी तो एका गावी आला. त्या गावातल्या एका श्रीमंताच्या घरासमोर लोकांची गर्दी होती. त्याच दिवशी रात्री त्या श्रीमंताचे हृदयविकाराने प्राणोत्क्रमण झाले होते. माधवने त्या श्रीमंताच्या



नातेवाइकांनाजवळ जाऊन विचारले–"मी यांना पुन्हां जिवंत करतो. पण त्याबद्दल तुम्ही मला काय देणार?"

परंतु कोणाचा त्याच्या बोलण्यावर विश्वासच बसेना. तेव्हां माधव साहस करून म्हणाला–"मी यांना जिवंत करू शकलो नाही तर तुमचे नुकसान तर होणार नाही ना? मग मला प्रयत्न करून पाहूं द्या. परंतु मी यांना जिवंत करून दाखविले तर तुम्ही मला काय द्याल, हे सांगा."

"एक लाख सुवर्णमुद्रा देऊ. तुला शक्य असेल तर तू यांना जिवंत करून दाखव." त्या श्रीमंताचे नातेवाईक म्हणाले.



माधव हात पाय धुवून एका तांब्यात पाणी घेऊन आला आणि त्या श्रीमंताच्या प्रेताजवळ बसला. त्याने मंत्रपाठ करून त्या प्रेतावर मंत्रवलेले पाणी शिंपडून त्या श्रीमंताला आपल्या आयुष्यातले एक वर्ष दिले. मंत्रवलेले पाणी अंगावर पडताच मृत देह हलला आणि थोडचा वेळाने तो श्रीमंत मनुष्य झोपेतून जागा झाल्यासारखा उठून बसला.

त्या श्रीमंताच्या नातेवाइकांना अपरंपार आनंद झाला. त्यांनी वचन दिल्याप्रमाणे एक लाख सुवर्ण मुद्राच नव्हे तर वस्त्र वाहनादि देऊन माधवची पादपूजा केली.

[illegible] परत आला. हळूहळू त्याची कीर्ती पंच-क्रोशीत पसरली. दररोज त्याच्या घरी पालखीत किंवा गाडचातून प्रेते येऊ लागली. माधवचा आयुर्दानाचा धंदा जोराने चालू झाला आणि त्याच्यावर पैशाचा पाऊस पडू लागला. गरीब लोकदेखील त्याच्याकडे आयुर्दान मागायला येऊ लागले.

माधव कोटचाधीश झाला. तरी आयुर्दानाचे कार्य अखंड चालू राहले. पुढे तो पैसे घेऊन आयुष्य देई ते फार कमी देऊ लागला. त्याने किती दिवसाचे आयुष्य दान केले आहे, हे त्याला एकटचालाच माहीत होते.

माधवने आतां लग्न करण्याचे ठरवून एका सुंदर मुलीशी लग्न करून घेतले. परंतु लग्नानंतर थोडचाच दिवसांनी त्याची बायको आजारी पडून मेली. परंतु माधवने तिला आपल्या आयुष्यातला थोडादेखील भाग दिला नाही. त्याने शांतपणे यथा-विधि आपल्या बायकोची अन्त्येष्टी करून टाकली.

ते पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. इतर लोकांना जिवंत करणाऱ्या माधवने आपल्या बायकोला आयुर्दान देऊन जिवंत कां केले नाही? प्रत्येकाला त्याचे मंत्रबळ संपले असावेसे वाटले. त्याच्याकडे कोणी प्रेत [illegible] "अहो, माधव आपल्या स्वतःच्या बायकोला जिवंत करू शकला नाही तर तो तुमच्या नातेवाइकाला कसा काय जिवंत करू शकेल?" असे सांगून लोक प्रेत घेऊन येणाऱ्यांना परतवून लावीत. हळूहळू माधव-कडे प्रेते येण्याचे बंद झाले. आणि माधव सुमारे ऐंशी वर्षे जगला.

वेताळ येथवर गोष्ट सांगून म्हणाला— "राजा! माधवने इतर सर्वांना आयुर्दान दिले. परंतु तो स्वतःच्या बायकोला कां जिवंत करू शकला नाही? तिला आयुर्दान केल्यास त्याला कोणाकडून धनलाभ होणार नाही यासाठी का? की त्याचे बायकोवर प्रेम नव्हते म्हणून. तिला अशा तऱ्हेने मरू देऊन स्वतःची कीर्ती आणि प्रतिष्ठा कां घालवून बसला? याचे उत्तर माहीत असून ही तू दिले नाहीस तर परिणाम तुला माहीतच आहे, तुझ्या डोक्याची शंभर शकले होऊन तुझ्याच पायावर लोळू लागतील."

विक्रमादित्य म्हणाला—"माधवने व्यापार केला होता. त्याचे भांडवल होते ते त्याचे आयुष्यच होते. ते मोजकेच होते. त्याने धनप्राप्तीसाठी व्यापार केला होता, कीर्ती किंवा मानप्रतिष्ठा मिळविण्यासाठी नव्हे. परंतु या व्यापारात त्याचे आयुष्य क्षीण होऊ लागले होते. त्याला आपल्या व्यापारात जे यश मिळे तेच त्याला घातक होऊ लागले आणि अशी वेळ आली की त्याला अपयश येणेच श्रेयस्कर वाटले. म्हणून त्याने ते अपयश आपल्या पत्नीला न वांचवून मिळविले. इतर कोणाला न वांचवून त्याला ते अपयश घ्यायचे नव्हते. म्हणून बायकोवर प्रेम असून ही तिला त्याने आयुर्दान केले नाही. दुसरे असे की त्याला पुष्कळ दिवस जगण्याची इच्छा होती. म्हणून त्याला पत्नी आणि यश दोन्हींचा त्याग करावा लागला."

राजाचे मौन अशा प्रकारे भंग होताच वेताळ प्रेताबरोबर अदृश्य झाला आणि झाडाला जाऊन लोंबकळू लागला.

(कल्पित)




मिशांची किंमत

एका गावी एक शीलकुलवान असा धर्मात्मा रहात असे. त्या गावात त्याने मदत केली नाही असा एकही मनुष्य नव्हता. दानधर्म करीत असता त्या धर्मात्म्या पुरुषाची सर्व इस्टेट संपुष्टात आली आणि शेवटी उपासमार होण्याची पाळी आली. म्हणून तो गावातल्या एका वाण्याकडे जाऊन म्हणाला–"शेटजी! मला पंचवीस रुपये कर्जाऊ द्या. माझ्याजवळ गहाण ठेवायला काही नाही. माझ्या मिशीचा एक केस गहाण म्हणून ठवून घेऊन कर्ज द्यावे."

त्या वाण्याने त्या कुलीन धर्मात्म्याला कर्जाची रक्कम देऊन निरोप दिला. ते पाहून त्याच्याकडे काम करणाऱ्या दिनू नोकराने वाण्याला विचारले–"शेटजी, तुम्ही त्या कुलीन माणसाच्या मिशीचा एक केस ठेवून घेऊन पंचवीस रुपये कर्ज दिलेत. मी आपल्या सर्व मिशा छाटून देतो, मला शंभर रुपये द्यावेत."

"अरे दिनू! मिशांची किमत उतरली आहे. एका काळी त्या धर्मात्म्या पुरुषाने मला माझ्या मिशांतल्या एका केसाबद्दल शंभर रुपये दिले होते. आता मिशांच्या केसांचा भाव उतरला आहे. तुला पाहिजे तर मी आपल्या मिशांचे केस दहादहा रुपयाला द्यायला तयार आहे. तू पंचवीस रुपये भावाने विकून पाहिजे तर पैसे मिळव." वाणी म्हणाला.





शक्कल

ताशकंद येथे मीर कमाल नावाचा एक व्यापारी रहात असे. त्यांच्याजवळ पैशाचा तोटा होता असे नाही. परंतु फुकटात उदरनिर्वाह कसा चालवायचा, हाच काय तो एक प्रश्न त्यांच्या समोर होता. त्यांना मूलबाळ ही नव्हते. मीर कमाल आठवड्यातून सहा दिवस व्यापार धंद्यासाठी परगांवी जाई आणि दर बुधवारी घरी परत येई. अशीच अनेक वर्षे लोटली.

एका बुधवारी मीरकमालाची बायको त्याला म्हणाली–"तुम्हां पुरुषांचे बरं आहे. नेहमी बाहेर हिंडता फिरता आणि मजा करतां. आम्हां बायकांना एकटीने बसून 'नको जीव' होऊ लागतो. एखादी बकरी गाय काही आणून दिलीत तर वेळ जाईल कदाचित."

मीरकमाल बायकोच्या करमणुकीसाठी एक हडकुळी मेंढी घेऊन आला. स्वस्तात आतां कमालच्या बायकोला विरंगुळ्यासाठी एक साधन मिळालें. ती मेंढी चोवीस तास ओरडत खोकत असे. घराच्या आसपास जे गवत किंवा हिरवळ होती ती मेंढीने फस्त करून टाकली.

दुसऱ्या बुधवारी कमाल परत आला तेव्हां त्याची बायको त्याला म्हणाली–"तुम्ही माझा जीव घ्यायलाच ही मरतुकडी मेंढी आणून दिलेली दिसते आहे. मी मेले की 'सुटलों एकदाचा' म्हणून श्वास सोडाल. म्हणून सांगते, ही मेंढी पुन्हां तुम्ही बाहेर गावी जाण्यापूर्वी कोणाकडे तरी पाठवून द्या, नाहीतर मला तरी माहेरी पाठवा."

"तू अशी एकरीवर कां येतेस करतो व्यवस्था!" मीरकमाल म्हणाला.

त्याच दिवशी मीरकमाल आपल्या आईच्या कबरीजवळ दुवा मागायला कबरस्तानात गेला. तेथे हिरवे गार गवत खूप

उंच वाढलेले दिसले. याहून जास्त चांगले गवत आपल्या मेंढीला कोठून मिळणार? असा विचार करून तो घरी गेला आणि मेंढीला घेऊन पुन्हां कबरस्तानात आला. तो तेथल्या पाहरेकऱ्याला म्हणाला–"अहो दादा! आतां उतारवय झाले आहे व मला मूलबाळ देखील नाही. अल्ला बोलवील तेव्हां गेलेच पाहिजे. पण दफन विधी करायला मागे कोणी नाही. स्वतःच तजवीज करून ठेवणार आहे. ही मेंढी मी तुमच्याकडे त्याच साठी घेऊन आलो आहे."

कबरस्तानाच्या पाहरेकऱ्याने हे फुकटात मिळालेले 'मेंढीदान' खुशीत स्वीकारले.


दोन महिन्यांनंतर कमालने कबरस्तानात जाऊन पाहिले तेव्हां त्याला ती मेंढी ओळखता आली नाही, इतकी लठ्ठ झाली होती. कमालने विचार केला, या मेंढीचे वजन मणाहून जास्तच असेल इतकी मोठी मेंढी दान म्हणून देणे म्हणजे मूर्खपणा आहे. नंतर तो पाहरेकऱ्याच्या घरी गेला आणि सलाम करून त्याला म्हणाला–"दादा! [illegible] एक मुलगा दत्तक म्हणून घेतला होता. तो आजारपणात अर्धा चमचा हकीमाचे औषध प्याल्याबरोबर मेला. शिवाय ताशकंद सोडून जायला सरकारी हुकूम झाला आहे. तेव्हां तुम्ही सुद्धा आपले सामान घेऊन चला."


"मी रे कशाला जाऊ?" पहारेकऱ्याने चकित होऊन विचारले.

"कशाला म्हणजे? मी जाईन तिकडे तुम्ही आलेच पाहिजे. मी मेल्यावर तुम्हांलाच माझा दफनविधी करावा लागणार आहे. तुम्ही ते कबूलपण केले आहे. म्हणून नाहीं का मी माझी मेंढी तुम्हांला आणून दिली?"

"मोठा आला आहे शाहणा! तुला जिकडे मरायचे असेल तिकडे जाऊन मर नाहीतर नदीत जाऊन जीव दे. घेऊन जा आपली मेंढी!" पाहरेकरी म्हणाला.

कमालची शक्कल यशस्वी झाली. तो मेंढी घेऊन आनंदाने आपल्या घरी गेला.





अकलेची परीक्षा

एका इनामदारांच्या घरी कमला नावाची एक मोलकरीण होती. तिचा नवरा देखील त्या इनामदाराच्या शेतात काम करीत असे. परंतु थोड्याच दिवसांपूर्वी तो आजारी पडून एकाएकी मरण पावला.

कमलाला हरी नावाचा एक मुलगा होता. हुशार होता, परंतु कमालीचा बेफिकीर आणि आळशी होता. एकदा ती आपल्या मुलाला म्हणाली–"तुला काही काम येत नाही आणि ठोंब्यासारखा बसून असतोस. तुझे पुढे कसे होईल, ते एकट्या देवालाच माहीत!"

हरी म्हणाला–"आई! मला काम दे आणि पहा, मी काम करतो की नाही!"

कमलाला आनंद झाला. ती दुसऱ्या दिवशी हरीला घेऊन इनामदारांकडे गेली आणि म्हणाली–"मालक! मला हा एकुलता एक मुलगा आहे. हा आपण सांगाल ते काम करायला तयार आहे. त्याला काय काम येते हे आपणच परीक्षा घेऊन पहा!"

इनामदार म्हणाले–"कामे काय पुष्कळ आहेत. देतो मी एक काम याला. याला ते काम येते की नाही हेदेखील कळेल. असे सांगून इनामदाराने आपल्या एका म्हाताऱ्या नोकराला बोलावून हरीला गोठ्यात न्यायला सांगितले आणि हरीला म्हणाला–"हे पहा, उद्यांपासून तू आमच्या म्हशी चरायला घेऊन जात जा. पण बेफिकीरपणे राहू नकोस बरं का! एकेका म्हशीची किंमत पांचशे रुपये आहे. जर का एखादी म्हैस हरविली तर मी पांचशे रुपये तुझ्या आईकडून वसूल करून घेईन." नंतर कमलाला म्हणाला–"कळलं का? मी तुझ्या मुलाला म्हशी चरायला घेऊन जायचे काम दिले आहे. निष्काळजीपणाने एखादी

म्हैस हरविली तर तुला पांचशे रुपये भरून द्यावे ला ातील."

कमलाने विचार केला, मुलाने सावधगिरीने वागावे म्हणून पांचशे रुपये सांगितले असतील. खरी किंमत कमीच असेल. म्हणून होकार दिला आणि हरी त्या दिवसापासून मालकाच्या हुकमाप्रमाणे कामाला लागला."

हरीला ते काम मुळीच आवडले नाही. त्याला थोडे फार लिहितां वाचतां येत होते. त्याला वाटत होते की इनामदार त्याला काहीतरी चांगले काम देतील. परंतु त्यांनी गुराख्याचे काम दिले. तो हुशार होता व त्याला असे वाटू लागले की इनामदाराला आपल्याला थोडे फार लिहितां वाचतां येते याची माहिती नसावी. त्यांना कळावे यासाठी त्याने एक युक्ती केली.

एक दिवशी हरीने एका मुलाला आपल्या म्हशी चरायला नेण्याचे काम दिले व त्याबद्दल खायला जिलबी दिली. मुलगा तयार झाला. हरी एक म्हैस घेऊन शेजारच्या गावी गेला व त्याने म्हशीच्या पाठीवर "एक [illegible] घ्यायची असेल त्यांनी गांवच्या मैदानावर संध्याकाळी हजर रहावे." असे लिहून गांवभर म्हशीला फिरविले.

संध्याकाळी दोन हजार लोक मैदानावर हजर झाले. हरी त्यांना म्हणाला–"प्रत्येकाने एकेक रुपया द्यावा आणि सर्वांच्या नांवाच्या चिठ्ठ्या टाकून ज्याच्या नावाची चिट्ठी निघेल त्याला म्हैस मिळेल."

त्याप्रमाणे प्रत्येकाने एकेक रुपया दिला. दोन हजार रुपये जमा झाले. चिट्ठी उचलल्यावर ज्याचे नाव आले त्याला म्हैस मिळाली.

हरीने दोन हजार रुपये मालकाला नेऊन दिले आणि त्याने केलेली युक्ती सांगितली.

इनामदार खूष झाला. हरीच्या हुशारीची परीक्षा झाली. त्याने हरीला त्या दिवसापासून हिशोब लिहिण्याचे काम दिले.

कमलाला आनंद झाला. तिचे व तिच्या मुलाचे पुढील आयुष्य सुखाचे झाले.





चोरी उघडकीला आली

कृष्णा नदीच्या काठी कृष्णा आणि रघू नावाचे दोन शेतकरी रहात असत. कृष्णा आळशी पण वस्ताद होता. परंतु रघू अगदी निराळ्या स्वभावाचा होता. तो जात्याच मेहनती आणि सरळ होता. म्हणून रघूच्या शेतात चांगले पीक निघे आणि हळूहळू त्याने चार पैसे जमविले देखील. परंतु कृष्णा आपल्या शेतात कधी पाऊल टाकील तर शपथ! तो चकाट्या मारीत आपला सर्व वेळ घालवी.


रघूकडे चार पैसे जमा झाले तेव्हां त्याने शेतीचे काय करण्यासाठी एक नोकर ठेवला आणि स्वतः बदके पाळून अंडी विकू लागला. त्या व्यापारात देखील पुष्कळ फायदा झाला.

कृष्णाला त्याचे मित्र म्हणाले–"काय रे! पाहिलेस का रघू बदकांची अंडी विकून खूप पैसे मिळवू लागला आहे, आणि तू तर शेतातदेखील काम करीत नाहीस! तू सुद्धा बदके पाळून अंडी विकायचा धंदा कां करीत नाहीस?"

कृष्णा रघूच्या घरी गेला आणि त्याने बदकांच्या अंड्यांचा धंदा कसा सुरू केला व त्यात त्याला बरकत कशी झाली सर्व विचारून घेतले. रघूने सहानुभूतीपूर्वक सर्व सांगितले देखील.

त्या प्रमाणे कृष्णाने काही बदके विकत आणली. परंतु ती वाढवून त्यांची अंडी विकायला मिळेपर्यंत त्याला धीर नव्हता. त्याची बदके त्याच्या निष्काळजीपणामुळे अशक्त झाली व कमी अंडी देऊ लागली. याउलट रघूची बदके व अंडी मोठी व वजनदार असत आणि अंड्यांची किंमत पण जास्त येई.

दोघांची दुकाने शेजारी शेजारीच होती. कृष्णा लबाड होता. संधी मिळेल तेव्हां



तो रघूच्या दुकानातून अंडी चोरून घेऊन येई. हळू हळू त्याने दररोज अंडी चोरून न्यायचा प्रघातच पाडला. एक दिवशी रघूला संशय आला, म्हणून त्याने पाळतीवर राहून कृष्णाला अंडी चोरीत असतां पकडले आणि बजावून सांगितले की त्याने पुन्हां कधी चोरी केली तर त्याला न्यायाधिशाच्या कचेरीत ओढून न्यावे लागेल. परंतु कृष्णाला चोरीची संवय पडली होती.

तेव्हां अगदी नाइलाजाने रघूने कृष्णाविरुद्ध कोर्टात फिर्याद केली. कोर्टात कृष्णानें सर्व अंडी त्याचीच असल्याचे सांगितले. चोरीचा आरोप खोटा ठरला.

रघूला कळेना की कृष्णाची खोड कशी मोडायची. तेव्हां त्याच्या बायकोने चोराला मुद्देमालासकट पकडून देण्याचा उपाय सुचविला. तेव्हां रघूची बायको त्याला म्हणाली—"त्यात कठीण असे काही नाही. तुम्ही आमचे गणपतीमामा आहेत ना, त्यांच्याकडे जाऊन विचारा. ते काही तरी मंत्र सांगतील."

रघूला तो सल्ला पसंत पडला आणि तो दुसऱ्या दिवशी बायकोच्या गणपती मामाकडे गेला.

गणपतीमामा थोडावेळ विचार करून म्हणाले—"रघुदादा! मी सांगतो तसे करा, म्हणजे चोर नक्कीच मुद्देमालासकट पकडला जाईल." असे सांगून गणपतीमामांनी रघूला एक उपाय सुचविला.

रघूने घरी परत जात असता दुकानात एक दोन वस्तू विकत घेतल्या आणि घरात गेल्यावर खोलीत बसून एकट्यानेच तो उद्योग करू लागला.

त्या दिवशी रघूला दुकानात जायला थोडा उशीर झाला. त्याने दुकान उघडून दुकानात सर्व अंडी ठेवून दिली आणि पाणी प्यायला म्हणून थोडावेळ बाहेर निघून गेला. तो परत यायच्या आत कृष्णाने काही अंडी चोरली. रघूने परत आल्यावर कृष्णाने अंडी चोरून नेल्याचे

[illegible] मोठमोठ्याने [illegible] लागला— "चोर, चोर!" ते ऐकून तिकडून जाणारा पोलीस शिपाई आला आणि चोर कोठे गेला आणि चोरी कसली झाली वगैरे गोष्टीची त्याने चवकशी केली.

रघू म्हणाला—"चोर आणखी कोण हो, हा आमचा शेजारीच, वीस अंडी चोरून घेऊन गेला आहे!"

"खोटे! सपशेल खोटे!" कृष्णा म्हणाला.

"काय हो, तुम्ही पूर्वी असाच चोरीचा आरोप लावून कृष्णाला कोर्टात ओढले होते ना? पण चोरीचा आरोप सिद्ध झाला नाही, विसरलात वाटते?" शिपायाने विचारले.


"मी या खेपेस साबित करून दाखवितो." रघू म्हणाला.

रघू आणि कृष्णा आपापल्या दुकानातला माल घेऊन पोलीस ठाण्यावर पोलीसाबरोबर गेले. कोर्टात गेल्यावर न्यायाधिशाने रघूला विचारले—"काय हो तुम्ही मागे असाच आरोप केला होतात, पण काय झाले? खोटाच ठरला, नाही का?"

शिपायाने कृष्णावर रघूने अंडी चोरल्याचा आरोप लावल्याचे कोर्टाला सांगितले.

"त्याचे प्रमाण काय?" न्यायाधिशाने विचारले.

"कृष्णा कच्ची अंडी विकतो, पण आज त्याच्या टोपल्यात उकडलेली अंडी कशी काय आली, विचारून पहावे त्याला! आज



मी सर्व अंडी उकडून आणली आहेत." रघू म्हणाला.

"माझ्या काही गिऱ्हाइकांनी उकडलेली अंडी आणायला सांगितली होती. म्हणून मी उकडली अंडी आणून ठेवली होती." कृष्णा म्हणाला.

रघू म्हणाला–"हुजूर! आपण कृष्णाच्या टोपलीतल्या अंड्याची टरफले काढून पहावी. त्यांवर माझे नाव लिहिलेले दिसेल. आपण पहावी टरफले काढवून."

"पाहतो!" असे सांगून न्यायाधिशाने अंड्यावरची टरफले काढवून पाहिले आणि रघूने सांगितल्याप्रमाणे खरोखरच अंड्यांवर त्याचे नाव लिहिलेले होते.

रघूने स्मित करून विचारले–"हुजूर! आपण कृष्णाला विचारावे तरी की त्याने कोणती जादू करून आणि कशासाठी माझे नाव आपल्या अंड्यांवर लिहिले?"

कृष्णा जवळ काही उत्तर नव्हते. चोरीचा आरोप सिद्ध झाल्यामुळे कृष्णाला तुरुंगात जावे लागले.

[illegible] चोराला मुद्देमालासकट कसे धरून दिले हे. आनंदाने सांगितले.

"परंतु ही चोरी कशी काय साबीत करून दाखविलीत, नाही कळले?" बायकोने विचारले. रघूने चोरलेल्या अंड्यांवर टरफलांच्या आत त्याचे नाव लिहिलेले होते असे सांगितले होते.

"परंतु तुमचे नांव अंड्यांवर कसे लिहिले गेले, हे नाही सांगितलेत?" बायकोने विचारले.

"तूच नव्हेतेस का सांगितलेस गणपतीमामांकडे जायला. मामांनी तेजाब आणि तुरटी मिसळून जे द्रव तयार होईल त्याने अंड्यावर लिहिलेले नाव उघडल्यावर टरफलाच्या आत उमटते असे सांगितले होते. मी खोलीत बसून तोच उद्योग केला होता. तू द्रवपदार्थ वाळल्यावर अंडी उकडून दिली होतीस. झाले, हीच जादू होती. दुसरे काही केले नाही." रघू म्हणाला.





उडणारा घोडा

शतके होऊन गेली, इराण देशात सबूर नावाचा सुलतान राज्य करीत असे. तो त्या काळच्या सुलतानात जास्त श्रीमंत व हुशार होता. त्याच बरोबर तो दानशूर पण तसाच होता. त्याच्या दरबारी जाऊन कोणी रिकाम्या हातांनी घरी परतत नसे. तो गरीबांचा कैवारी होता व परदेशी विद्वानांचा आदर करी. परंतु न्यायनिवाडा करण्यात तो कडक होता. अपराध सिद्ध झाला की तो इतकी कडक शिक्षा करी इतर लोकांना त्याची दहशत बसे.

सुलतानाला एक मुलगा होता आणि एकीहून एक सुंदर अशा तीन मुली होत्या. मुलाचे नाव कमर अक्मार होते.

दरवर्षी सुलतान आपल्या प्रजेच्या मनोविनोदार्थ दोन मोठे उत्सव करी–वसंत ऋतूत नवरोज उत्सव होई आणि हेमंत ऋतूत मिहिरगान उत्सव. या दोन्ही उत्सवांच्या वेळी सुलतानाच्या महालाचा दरवाजा सर्वांसाठी खुला असे आणि सुलतान खुल्या दिलाने दानधर्म करी. नव्या लोकांना सुलतानाच्या दरबारी नोकरी आणि जुन्या नोकरांना पगारवाढ मिळे. उत्सवांच्या वेळी इराण देशाच्या काना कोपऱ्यातून लोक राजधानीत येत. विद्वान मौलवी व पंडित, कारागीर आणि कलाकार, नट आणि नृत्यकार येऊन आपले कौशल्य दाखवून इनाम मिळवून स्वदेशी जात. प्रजा मनोरंजन व करमणुकीचे कार्यक्रम पहायला येई आणि सुलतानाला स्वखुषीने नजराणे देई. सुलतान सर्वांचा यथायोग्य सत्कार करी.

एकदा नवरोज उत्सव चालू होता. सुलतान दरबारात बसला असतां तीन जण आपापले कौशल्य दाखविण्यासाठी सुलतानाच्या दरबारात आले. त्यांच्या पैकी

प्रत्येक एकेक शास्त्राचा विद्वान होता. ते आपापल्या कलेचे प्रदर्शन करून लोकांची 'वाहवा' मिळावी म्हणून आले होते. एक जण हिंदुस्थानातून आला होता, दुसरा रोमचा होता व तिसरा इराण देशातलाच होता. तिसऱ्याला इराणी भाषा येत होती.

हिंदुस्थानातून जो पंडित आला होता त्याने सुलतानाला लवून नमस्कार केला आणि त्याला आशीर्वाद देऊन एक भेट सुलतानासमोर ठेवली. ती एक मूर्ती होती. ती सोन्याची मूर्त आणि हिऱ्या माणकांनी मढलेली होती. त्या मूर्तीच्या हातात एक वाजवायचे शिंग होते.

"या मूर्तीचे विशेष काय?" सुलतानाने त्या पंडिताला विचारले.

[illegible] "जहांपनाह! या मूर्तीतली [illegible] पाहिल्यावरच या मूर्तीचे विशेष लक्षात येईल. ही मूर्त आपण आपल्या राजधानीच्या द्वारावर ठेवून द्यावी. ती रात्रंदिवस पाहरा देईल. शत्रू स्वारी करायला आला तर तो जवळ येण्यापूर्वी ही मूर्त शिंग वाजवून आल्याची सूचना देईल. शत्रू शिंगाचा आवाज ऐकूनच थरथर कापू लागेल आणि युद्ध झाल्याशिवायच भयभीत होऊन जागच्या जागी ठार होईल."

"तुम्ही या मूर्तीविषयी जे काही म्हणालात ते आहे मोठे गमतीदार ते खरे ठरले तर तुम्हांला मी तुम्ही मागाल ते बक्षिस देईन. पण जर का ते खोटे ठरले तर [illegible] म्हणाला.


त्यानंतर रोमचा कारागीर समोर आला. त्याने एक चांदीचे मोठे तबक सुलतानासमोर ठेवले. त्या तबकात मधोमध एक सोन्याचा मोर होता आणि चारही बाजूला चोवीस लांडोर होते.

सुलतानाने विचारले–"कारागीर! या मोराचा आणि लांडोरांचा उपयोग काय, सांगाल का?" सुलतानाने विचारले.

"जहांपनाह! हा मोर प्रत्येक तासाला एका लांडोराला चोंच मारील आणि पिसारा पसरून नाचेल. असे चोवीसदा केले की एक दिवस व एक रात्र संपेल. म्हणजे हे तबक एक घड्याळच आहे. एवढेच नव्हे तर एक महिना पुरा झाला की हा मोर तोंड उघडून आपल्याला द्वितीयेच्या चंद्राचे दर्शन घडवील."

"खरोखरच गंमतीदार आहे खरे तुमचे हे घड्याळ! तुमचे म्हणणे खरे निघाले तर तुम्ही मागाल ते बक्षिस मी देईन. परंतु जर का खोटे निघाले तर मात्र फांशीची शिक्षा मिळेल!" सुलतानाने बजावून सांगितले.

नंतर इराण देशातला कारागीर पुढे आला. त्याने लवून मुजरा केला आणि एक लाकडी घोडा सुलतानासमोर आणून उभा केला. तो शिशवीचा घोडा होता. आणि त्यावर सोन्याचांदीच्या नक्षीचे काम केले होते." घोड्याच्या पाठीवर खोगीर





सवलेले होते आणि तोंडात लगाम बसविलेला होता. घोडा सुंदर होता.

घोडा पाहून सुलतानाने त्याचे विशेष विचारले.

इराणी कारागार म्हणाला–"जहांपनाह! या घोड्यावर जो कोणी बसेल तो आपले मन ज्या वेगाने धावू शकते त्या वेगाने पाहिजे तिकडे उडू शकेल. सामान्य घोडा वर्षभर पळत राहीला तर जितका दूर पळेल तितके अंतर हा घोडा एका तासात कापून काढील, तरी तो दमणार नाही."

"तुम्ही म्हणालात ते खरे ठरले तर तुम्हांला मागाल ते बक्षिस मिळेल. नाही तर फांशी!" सुलतानाने बजावून सांगितले.

आणला होता त्याची परीक्षा तीन दिवसात झाली आणि तिघांचे म्हणजे खरे असल्याबद्दल सुलतानाची खात्री झाली. सुलतान गमतीखातर इराणच्या कारागिराने आणलेल्या घोड्यावर बसून आकाशात एक चक्कर मारून आला.

सुलतान सबूर आनंदाने तिघांना बोलावून म्हणाला–"तुम्ही तिघांनी आपापल्या वस्तूचे विशेष मला पटवून दिले आहे. तेव्हां तुम्ही मागाल ते द्यायला मी तयार आहे."

ते ऐकून तिघे म्हणाले–"जहांपनाह! आपण आपल्या तिघां मुलींची लग्ने आमच्याशी करून द्यावी अशी विनंती आहे! आपले जांवई होण्याची आमची इच्छा आहे."

सुलतान म्हणाला–"कबूल! मी तुमच्या इच्छेप्रमाणे तुमचे लग्न करून देतो." असे सांगून सुलतानाने काजीला आणि साक्षीदारांना बोलावून आणविले आणि त्यांना लग्नासंबंधी कागदपत्र तयार करायला सांगितले.


पडद्यामागून तिघी राजकन्या तिघां कारागिरांनी आणलेल्या वस्तू कौतुकाने पहात होत्या. सुलतानाची तिसरी राजकन्या आपल्या होणाऱ्या पतीकडे पाहून

तिघी बहिणीत तीच जास्त सुंदर होती. आपल्याला त्या थेरड्याशी लग्न करावे लागणार या विचारानेच तिला वेड लागल्यासारखे झाले. ती आपल्या खोलीत जाऊन रडू लागली. अंगावरचे कपडे फाडून ती वेड्यासारखी आपलेच तोंड ओरबडू लागली.

त्याच वेळी तिचा भाऊ कमर अक्मार शिकार संपवून घरी परतला. बहिणीला रडत असलेली ऐकून तो सरळ तिच्या खोलीत गेला आणि तिच्या रडण्याचे कारण विचारले.

ती म्हणाली–"अरे दादा! माझे कर्म! बाबांनी एका शंभर वर्षाच्या थेरड्याशी माझे लग्न करून देण्याचे वचन दिले आहे. तो एक लाकडी घोडा घेऊन आला आहे आणि तो घोडा आकाशात उडतो. आपल्या बाबांना वेड लावले आहे त्या घोड्याने. मी जीव देईन, पण त्या थेरड्याशी लग्न करणार नाही."

कमरने आपल्या बहिणीचे सांत्वन केले आणि तिच्या मर्जीविरुद्ध काही होणार नाही असे तिला सांगून तो सरळ बापाकडे गेला आणि म्हणाला–"अब्बाजान! आपण माझ्या धाकट्या बहिणीचे लग्न एका



थेरड्याशी करून द्यायचे वचन दिले आहे का? तो कोणता नजराणा घेऊन आला आहे, कोणास ठाऊक आणि आपण त्याच्या साठी आपल्या सुंदर मुलीचा बळी का देणार? या लग्नाचा हट्ट आपण धरलात तर माझी बहीण नक्कीच आत्महत्या करील."

कमर हे सर्व आपल्या बापाला सांगत असतां तो घोडा आणणारा कारागीर जवळच उभा राहून सर्व ऐकत होता. त्याला राग आला, परंतु त्याला काहीच करता येण्यासारखे नव्हते. त्याच वेळी सुलतान आपल्या मुलाला म्हणाला–"अरे बेटा! हा कारागीर जो घोडा घेऊन आला

ाहे तो तू पाहिलास तर तू असे बोलणार ाहीस."

नंतर तो मुलाला घेऊन बाहेर आला. ्याने मुलाला तो लाकडी घोडा दाखविला. ुमर तो घोडा पाहून भुरळला. त्याला ोडयाच्या स्वारीचा छंदच होता. म्हणून टकन उडी मारून तो घोडयावर बसला. ्याने घोडयाला टाच मारून लगामाने ालायला खूण केली. परंतु घोडा जागचा ालाच नाही.

तेव्हां सुलतानाने कारागिराला विचारले– कां हो, घोडा कां हालत नाही पाहता ा? माझ्या मुलाला घोडयाचे हे यंत्र ्से चालते ते सांगा. त्यानंतर तुमच्या च्छेप्रमाणे सर्व होईल."

म्हातारा सुलतानाच्या मुलाला चांगली ाद्दल घडविण्याची संधी पहात होता. तो ुमरलाजवळ जाऊन म्हणाला–" काही नाही ो, खोगिराच्या उजव्या बाजूला जी गुंडी ाहे ती फिरवा म्हणजे घोडा उडू लागेल." ुलतानाच्या मुलाने त्याप्रमाणे उजवी कडची गुंडी फिरविली आणि घोडा आकाशात उडू ...ला. ... तीन मिनिटात कमर दूर उडत जात दिसेनासा झाला. कित्येक तास लोटले तरी तो परत आला नाही.


आतां मात्र सुलतान घाबरला. त्याने कारागिराला विचारले–"काय हो माझ्या मुलाला जमिनीवर कसे आणायचे सांगा!"

म्हातारा म्हणाला–" जहांपनाह! आतां आपल्या चिरंजीवांचे परत येणे अशक्यच समजा. खाली उतरायला डाव्या बाजूची गुंडी फिरवावी लागते. ते मी सांगण्यापूर्वीच तुमचे चिरंजीव उडव्या बाजूची गुंडी फिरवून आकाशात उडून गेले. अर्धवट ज्ञानाचा असा दुष्परिणाम होतो."

परंतु सुलतानाला त्या कारागिराचा राग आला. "त्या म्हाताऱ्याला बडवून टाका रे तुरुंगात!" सुलतानाने हुकूम सोडला.

त्यानंतर तो दु:ख करीत आपली छाती बडवीत घरात गेला आणि अंत:पुरातील स्त्रियांबरोबर शोकसागरात बुडला.

(क्रमश:)



ब्रह्मदेवाचा एक पैसा

प्राचीन काळी रामशर्मा नावाच्या ब्राह्मणाने ब्रह्मदेवाचे स्मरण करून तपश्चर्येला सुरवात केली.

पुष्कळ वर्षे लोटल्यावर ब्रह्मदेवाने दर्शन देऊन विचारले–"काय रे भक्ता! तू कशासाठी माझे स्मरण केलेस?"

रामशर्मा म्हणाला–"ब्रह्मदेवा! लोक म्हणतात की तू भक्तवत्सल आहेस. पण मला दर्शन द्यायला तू इतका उशीर कां केलास?"

"वत्स! तुमचे एक युग हे माझ्या एका दिवसाच्या बरोबरचे असते रे. मी त्या हिशोबाने एका क्षणात आलो." ब्रह्मदेव म्हणाला.

रामशर्माने विचारले–"तर देवा! आमचे एक कोटी रुपये तुमच्या किती पैशा इतके होतात?"

"एका पैशा इतके!" ब्रह्मदेव म्हणाला.

"तरमग आपला एकच पैसा मला द्या!" रामशर्मा म्हणाला.

"आलो बरं का एका मिनिटात." असे सांगून ब्रह्मदेव अंतर्धान पावला.





धनच सुखाचे मूळ

…का गावी शिवराम नावाचा एक श्रीमंत शेतकरी रहात असे. त्याला तीन …लगे होते. तिघे शेतात काम करीत …णि बापाच्या पावलावर पाऊल टाकून …लत.

मुले मोठी झाल्यावर शिवरामने त्यांची …ग्ने करून दिली आणि सर्व लागवडीची …मे त्यांच्यावरच टाकली.

हळूहळू तिघां मुलांची लग्ने झाली आणि …ना आल्या. शिवरामच्या आयुष्यात एकदम …दल झाला. सकाळी उठल्याबरोबर एक …न दंतमंजन व पाणी आणून देई. तोंड …ऊन आल्याबरोबर दुसरी सून पाट मांडून …यला करून ठेवलेले आणून देई. सकाळचे …णे झाल्यावर तिसरी सून सासऱ्याच्या …ठकीत रामायण भागवतासारखे ग्रंथ …चायला नेऊन ठेवी. अशातऱ्हेने तिघी …ना सासऱ्याच्या सेवेला सतत हजर असत. मुले शेतात जे पीक निघे ते घरी आणून त्याचा हिशोब बापाला देत. शिवरामला वाटू लागले की देवाची कृपा म्हणून त्याचे वार्धक्य सुखात जात आहे.

तीन प्रहरी वामकुक्षी झाल्यावर शिवराम आलेल्या मित्रमंडळींना रामायणातल्या व महाभारतातल्या कथा सांगे आणि संदर्भाने आपल्या मुलांचे व सुनांचे कौतुक करीत त्याला म्हातारपणी किती सुख मिळत आहे सांगे.

असाच एकदा त्याचा बालमित्र रंगनाथ त्याला भेटायला आला असतां शिवरामने त्याला ईश्वरकृपेने त्याचे मुलगे व सुना त्याला कशा प्रेमाने वागवतात हे सांगितले.

रंगनाथ सर्व ऐकून स्मित करीत म्हणाला–"आणखी एक काम कर. संसाराचे सर्व ओझे फेकून देऊन मोकळा हो. जमीन- [illegible] मुले आपमान भांडून सर्व घालवून बसतील." असे सांगून रंगनाथ निघून गेला.

शिवरामने मित्राच्या सल्ल्यातली गोम न ओळखून त्याने सुचविल्याप्रमाणे आपली सर्व इस्टेट मुलांमध्ये सारखी सारखी वांटून दिली.

त्या दिवसापासून शिवरामच्या आयुष्यात एक विचित्र बदल झाला. हा बदल फार मोठा होता. शिवरामला आतां कोणीच विचारीनासे झाले. त्याला काय हवे नको हे विचारायचे तर दूरच, मुलांनी शेतात किती मिळकत झाली हे देखील सांगायचे बंद केले.

आतां शिवरामला जीव नकोसा वाटू लागला. तो अंगणातल्या चौथऱ्यावर एकटा बसून देवाचा धांवा करू लागला की देवा, लवकर बोलावून घे. कोणी येणारा जाणारा मित्र येऊन बसला तर त्याला तो त्याला मुलांच्या व सुनांच्या बेफिकीरपणामुळे किती कष्टाने दिवस काढावे लागत आहेत, सांगे.

शिवरामचा रामशास्त्री नांवाचा एक समवयस्क मित्र होता. त्याने सर्व ऐकून घेतले व म्हणाला–"बाबारे! जुनी म्हण आहे, विसरलास का? 'धन मूलं इदं जगत्!' या जगाचे मूळ धन आहे. ईश्वर-भक्ती वगैरे सर्व फुकट आहे. तुझ्या जवळ जोंपर्यंत चार पैसे होते व शेती होती तोंपर्यंत मुले व सुना तुझी विचारपूस



रीत. ते मिळाल्यावर त्यांना तुझी गरज रली नाही. मी तुला पुन्हां चांगले दिवस ह्यायला युक्ती सुचवितो. मी तुला एक ऱ्याची पेटी आणि शंभर रुपयाचा खुर्दा गणून देतो. तू दार लावून आपल्या ोलीत तो खुर्दा दररोज एकेक करून त्या टीत मोजून टाकीत जा. एका हाताने पैसे ाक व दुसऱ्या हाताने काढून घे. गंमत हा, काय होते ते!"

त्या दिवसापासून सुनांना सासऱ्याच्या ोलीतून पैशांचा खणखणाट ऐकू येऊ ागला. पहिल्यांने त्यांनी चकित होऊन रस्परांकडे पाहिले. नंतर दुसऱ्या दिवसा- ासून सासऱ्याच्या सेवेला हजर राहू ागल्या.

आतां शिवरामच्या आयुष्यात पुन्हां दल झाला. सुना येऊन पहिल्यासारख्या चारपूस करू लागल्या आणि मुले देखील ापाच्या खोलीत जाऊन शेतात कोणते क कसे निघाले, सांगू लागली. रामशास्त्री रून हे सर्व पहात होता. त्याला त्याची युक्ती [illegible] उपयोगी पडल्याचे पाहून आनं[illegible]ला.

शिवरामने तीन चार वर्षांनी जगाचा निरोप घेतला तेव्हां मुलांनी व सुनांनी हौसेने त्याच्या क्रियाकर्मासाठी खूप पैसे खर्च केले. रामशास्त्री हजर होता. तो मुलांना म्हणाला—"हे पहा, तुमच्या वडिलांनी मागे काही ठेवले असेल! पेटी उघडून पहा. पेटीत काही असेल तर सारखे सारखे वांटे करून घ्या."

मुले उत्सुक होतीच. त्यांनी रामशास्त्री समोरच बापाच्या पेटीचे कुलूप उघडले. गावातले काही प्रमुख मंडळी पण हजर होती. पेटीत बराचसा खुर्दा होता आणि त्याबरोबर एक चिट्ठी पण होती. चिट्ठीत लिहिले होते—"या पेटीत जे पैसे आहेत ते सर्व रामशास्त्रीचे आहेत. ते त्याला देऊन टाकावेत!"

ती चिट्ठी पाहून शिवरामची मुले व सुना चकित होऊन परस्परांकडे पाहू लागल्या. रामशास्त्री आपले पैसे घेऊन निघून गेला.



दोन मूर्ख

एका गांवी दोन मूर्ख रहात असत. बालपणापासूनच त्यांची परस्परांशी गट्टी होती. एकदां गावातल्या गल्लीत दोघे परस्परांना भेटले. एकाच्या हातात एक पिशवी होती आणि पिशवीत काही तरी होते.

दुसऱ्या मूर्खाने त्याला विचारले—"काय रे आहे या पिशवीत?" पहिल्या मित्राने आपल्या अकलेचे काजवे पाडीत उत्तर दिले—"या पिशवीतली सर्व अंडी तुला देईन."

दुसरा मूर्ख बराच वेळ विचार करून ही काही उत्तर देऊ शकला नाही.

तेव्हां पहिला मूर्ख म्हणाला—"अरे या पिशवीत काय आहे, तुला सांगता आले नाही. अरे अंडी आहेत. किती अंडी आहेत हे सांगितलेस तर पिशवीतली दहाची दहा अंडी तुला देऊन.

दुसरा मूर्ख विचार करीत उभा राहीला. त्याला काय उत्तर द्यावे, सुचेना.



रीत. ते मिळाल्यावर त्यांना तुझी गरज
रली नाही. मी तुला पुन्हां चांगले दिवस
ह्ायला युक्ती सुचवितो. मी तुला एक
ष्याची पेटी आणि शंभर रुपयाचा खुर्दा
णून देतो. तू दार लावून आपल्या
ोलीत तो खुर्दा दररोज एकेक करून त्या
टीत मोजून टाकीत जा. एका हाताने पैसे
क व दुसऱ्या हाताने काढून घे. गंमत
हा, काय होते ते!"

त्या दिवसापासून सुनांना सासऱ्याच्या
ोलीतून पैशांचा खणखणाट ऐकू येऊ
ागला. पहिल्यांने त्यांनी चकित होऊन
रस्परांकडे पाहिले. नंतर दुसऱ्या दिवसा-
सून सासऱ्याच्या सेवेला हजर राहू
ागल्या.

आतां शिवरामच्या आयुष्यात पुन्हां
दल झाला. सुना येऊन पहिल्यासारख्या
चारपूस करू लागल्या आणि मुले देखील
पाच्या खोलीत जाऊन शेतात कोणते
क कसे निघाले, सांगू लागली. रामशास्त्री
रून हे सर्व पहात होता. त्याला त्याची
युक्ती [illegible] उपयोगी पडल्याचे पाहून
आनं[illegible]ला.

शिवरामने तीन चार वर्षांनी जगाचा निरोप घेतला तेव्हां मुलांनी व सुनांनी हौसेने त्याच्या क्रियाकर्मासाठी खूप पैसे खर्च केले. रामशास्त्री हजर होता. तो मुलांना म्हणाला–"हे पहा, तुमच्या वडिलांनी मागे काही ठेवले असेल! पेटी उघडून पहा. पेटीत काही असेल तर सारखे सारखे वांटे करून घ्या."

मुले उत्सुक होतीच. त्यांनी रामशास्त्री समोरच बापाच्या पेटीचे कुलूप उघडले. गावातले काही प्रमुख मंडळी पण हजर होती. पेटीत बराचसा खुर्दा होता आणि त्याबरोबर एक चिट्ठी पण होती. चिट्ठीत लिहिले होते–"या पेटीत जे पैसे आहेत ते सर्व रामशास्त्रीचे आहेत. ते त्याला देऊन टाकावेत!"

ती चिट्ठी पाहून शिवरामची मुले व सुना चकित होऊन परस्परांकडे पाहू लागल्या. रामशास्त्री आपले पैसे घेऊन निघून गेला.



दोन मूर्ख

एका गांवी दोन मूर्ख रहात असत. बालपणापासूनच त्यांची परस्परांशी गट्टी होती. एकदां गावातल्या गल्लीत दोघे परस्परांना भेटले. एकाच्या हातात एक पिशवी होती आणि पिशवीत काही तरी होते.


दुसऱ्या मूर्खाने त्याला विचारले–"काय रे आहे या पिशवीत?" पहिल्या मित्राने आपल्या अकलेचे काजवे पाडीत उत्तर दिले–"या पिशवीतली सर्व अंडी तुला देईन."

दुसरा मूर्ख बराच वेळ विचार करून ही काही उत्तर देऊ शकला नाही.

तेव्हां पहिला मूर्ख म्हणाला–"अरे या पिशवीत काय आहे, तुला सांगता आले नाही. अरे अंडी आहेत. किती अंडी आहेत हे सांगितलेस तर पिशवीतली दहाची दहा अंडी तुला देऊन.

दुसरा मूर्ख विचार करीत उभा राहीला. त्याला काय उत्तर द्यावे, सुचेना.





गर्वोपहार

पांड्य राजाच्या दरबारात विष्णुशास्त्री नांवाचा एक महा विद्वान पंडित रहात असे. राजा त्याचा फार आदर करी. त्या मुळे विष्णुशर्माला गर्व चढला व तो सर्व पंडितांना त्रास देऊं लागला. तो पंडितांकडून कर वसूल करू लागला आणि दिला नाही तर तो त्यांना शास्त्रार्थासाठी आव्हान करी. पंडितांना त्याची अशी दहशत बसली होती की विष्णुशर्माला लोक "कोलाहल पंडित" या नावानेच ओळखू लागले. त्याच्या भीतीने कित्येक विद्वान पंडित राज्य सोडून निघून गेले.

त्या राज्यांत महाभाष्य भट्ट म्हणून नाणखी एक विद्वान पंडित रहात असे. तो सात्विक वृत्तीचा होता. तो शांतपणे आपल्या आश्रमात बसून वेदशास्त्रांचा अभ्यास करी. त्याच्याकडे जी शिष्यमंडळी होती तीदेखील त्याच्यासारखीच सात्विक वृत्तीची होती. कोलाहल पंडिताचा कर भरणे त्याला कष्टाचे जाई.


महाभाष्य भट्टाकडे यामुन नांवाचा एक तेजस्वी शिष्य होता. तो आज्ञाकारी आणि सदाचारी होता. आपल्या गुरूला तो देव तुल्य मानून त्यांची भक्तिभावनेने सेवा करी. त्याने गुरुगृही राहून षड्शास्त्रे आणि षोडश कला शिकून घेतल्या होत्या.

महाभाष्य भट्टकडून कोलाहल पंडिताला लागोपाठ दोन वर्षे कर मिळाला नाही. म्हणून त्याने आपल्या वंजी नांवाच्या शिष्याला पाठविले. वंजी एक वल्लीच होता. ते मोठमोठ्या पंडितांना धमक्या देऊन करवसूलीचे काम करी.

वंजी महाभाष्य भट्टाच्या आश्रमात आला तेव्हां ते कोठे बाहेर गांवी गेले होते व एकटा यामुन आश्रमात होता. वंजी महाभाष्य भट्टाने कर न दिल्याबद्दल त्यांचे [illegible] नाही. तो म्हणाला–"काय रे! माझ्या गुरुवर्यांनी तुझ्या गुरूला कशासाठी रे कर द्यायचा? पांडित्यात ते माझ्या गुरुवर्यापेक्षां मोठे आहेत का?"

"अस्सं! तरमग तू आपल्या गुरुवर्यांना आमच्या गुरुवर्यांशी शास्त्रार्थ करायला पाठवून दे. मग लहान कोण व थोर कोण हे कळेल!" वंजी म्हणाला.

"तुझ्या गुरूचा पराभव करण्यासाठी माझ्या गुरुवर्यांना इतक्या दूर जाण्याची गरजच काय? मी येतो, त्यांच्याशी शास्त्रार्थ करायला." असे सांगून यामुन पांड्य राजाच्या दरबारात गेला.



यामुन कोलाहल पंडिताशी शास्त्रार्थ करायला आला असल्याचे ऐकून विद्वान पंडितांची दरबारात गर्दी झाली. लोक म्हणाले–"राई आणि पर्वताची काय बरोबरी? बिचाऱ्याचा धुव्वा उडून जाईल!"

राणीला कोलाहल पंडिताचा घमेंडखोरपणा मुळीच आवडत नसे. यामुनला पाहून तिला वाटले;–"ही विस्तवाची ठिणगी गवताच्या गंजीला आग लावून भस्म करणार!"

त्यानंतर कोलाहल पंडित आणि यामुन यांचा शास्त्रार्थ सुरू झाला. कोलाहल पंडिताने यामुनला तर्क आणि व्याकरण शास्त्रावर काही प्रश्न केले आणि यामुनने सर्वांची समाधानकारक उत्तरे दिली.

तेव्हां कोलाहल त्याला म्हणाला–"तू स्वतःच्या इच्छेप्रमाणे मला वाटेल तो प्रश्न घेऊन त्याचे समाधानकारक उत्तर दे. मी त्याचे खंडन करतो. मी खंडन करू शकलो नाही तर मी हारलो आणि तू विजयी झालास असे मी मान्य करीन."

यामुन म्हणाला–"आपली आई वन्ध्या स्त्री आहे का? नाही!"

"तू म्हणालास ते बरोबर आहे. मी याचे खंडन करणार नाहीं!" कोलाहल म्हणाला.

''पांडव राजा धर्मात्मा आहेत का? आहेत!'' कोलाहल म्हणाला.

''होय हे निर्विवादच आहे!'' कोलाहल पंडित म्हणाला.

''महाराणी पतिव्रता आहेत का? आहेत!'' यामुन म्हणाला.

''होय हे पण पूर्णपणे निर्विवाद सत्य आहे!'' कोलाहल म्हणाला.

''तर मग आपण हारलात व मी जिंकलो. कारण मी जे सांगितले त्याचे तुम्ही खंडन करू शकला नाहीत तरी मी करून दाखवितो.'' यामुन म्हणाला. सर्व दरबारी चकित होऊन यामुनकडे पाहू लागले.

''आपण आपल्या मातोश्रींचे एकुलते एक चिरंजीव आहां, होय ना? या विषयी मनुसंहितेत ''एक पुत्रो ह्यपुत्रा इति लोकवादात्'' म्हटले आहे. म्हणून त्यांना एक मुलगा असून ही त्या 'अपुत्रा' म्हणजे त्यांच्या सारख्याच आहेत.

'' 'सर्वतो धर्म षड्भागो, राज्ञो भवति रक्षतः । अधर्मादपि षड्भागो भवत्यस्य रक्ष[illegible]' हे देखील [illegible]संहितेत सांगितले आहे [illegible] प्रजेकडून होणाऱ्या पाप-पुण्यातला सहावा भाग राजाला मिळतो. या कलियुगात राजा किती मोठा धर्मात्मा असला तरी प्रजेकडून घडणाऱ्या पापांचा सहावा वांटेकरी तोच आहे. म्हणून तर्क दृष्ट्या महाराज म्हटले आहे धर्मात्मा ठरत नाहीत.''

''आतां राणी सरकारांविषयी. मनुसंहितेत–''सोग्निर्भवति, वायुश्च, सोर्क, स्सोम स्सधर्मराट्, स कुबेर स्स वरुणः, स महेन्द्रः प्रभावतः!'' राजाच्या अंगात अग्नी, वायु, अर्क, चंद्र, यमधर्म कुबेर, वरुण, इंद्र असे आठ जण असतात. त्या आठ जणांच्या पत्नी राणी पतिव्रता कशा काय होणार?'' यामुनने विचारले.

राजा व सभासद यामुनची चमत्कार पूर्ण विद्वत्ता पाहून त्याची प्रशंसा करू लागले. कोलाहल पंडिताचा गर्वपरिहार झाला आणि तो राज्यसभेतून उठून निघून गेला.





चिक्कू म्हातारी

एका गावी एक चिक्कू म्हातारी रहात असे. तिच्या जवळ एक पडकी झोपडी, एक बदामाचे झाड आणि एक कढीलिंबाचे झाड होते.

कोणी कढीलिंब मागायला आला की ती मूठभर तांदूळ मागून घेऊन दोन डहाळ्या तोडून देई. गावातली मुले बदाम मागायला येत तर ती एक पैसा घेऊन एक बदाम देई. म्हातारीच्या झोपडीत सैंपाकाची तीन-चार मातीची भांडी, एक घाणेरडी मळकी उशी आणि एक फाटकी घोंगडी एवढ्याच वस्तू होत्या.

त्या गावात लक्ष्मण नावाचा एक उनाड मुलगा होता. त्याने म्हातारीबरोबर राहून फायदा होईल असा विचार केला. कारण ती मेली म्हणजे तिच्याजवळ जे काही आहे ते आपल्या मिळेल असा विचार करून तो म्हातारीच्या घरी गेला. त्या वेळी म्हातारी बदामाच्या झाडाखाली कांबळे टाकून, खारी येऊन बदाम पाडीत म्हणून ती पडल्या पडल्या पाहारा देत होती.

लक्ष्मण जवळ जाऊन म्हणाला–''आजी! तुमच्या झाडावरचे बदाम कसे आहेत हो?''


म्हातारीने प्रथम लक्ष्मणकडे पायापासून डोक्यापर्यंत निरखून पाहिले आणि म्हणाली–''खाऊन कोणी पाहिले रे? पाहिजे तर एक पैसा देऊन घे आणि खाऊन पहा!''

ते ऐकून लक्ष्मण हंसत म्हणाला–''आजी! मी मदत करीत जाईन. मला आपल्या घरी कां नाही ठेवून घेत?''

''तू काय करणार मदत? फुकट खायला द्यायला नाही माझ्याकडे काही.'' म्हातारी म्हणाली.

''दोन दिवस मला आपल्याकडे ठेवून तर पहा. तुम्हांला फुकट खर्च होतो असे वाटले तर चालू लागायला सांगा. मी

क. शशीधर जाधव



नघून जाईन. तुमचे बदाम व कढीलिंब ी बाजारात जाऊन विकीन. तुम्हांला ार पैसे जास्तच मिळतील." लक्ष्मण ्हणाला.

म्हातारी थोडा वेळ विचार करून ्हणाली–"तर खारींवर पाहरा ठेव. मला ुझे काम आवडले तर तुला ठेवून घेईन." ासे सांगून म्हातारी उशी व घोंगडी ेऊन झोपडीत गेली.

म्हातारी लक्ष्मणला दोन वेळ जेवायला ाढी, परंतु त्याला खूप काम सांगे. बाजा-ात विकायला बदाम व कढीलिंब देई तो ोजून आणि किंमत सांगून देई. एक ैसा कमी आला तर लक्ष्मणला शिव्या

शाप [illegible] लागत. इतके सर्व झाले तरी [illegible] सर्व सहन करीत म्हातारीच्या मरणाची वाट पाहू लागला.

काही काळ लोटल्यावर म्हातारी इतकी अशक्त झाली की तिला उठणे बसणेदेखील अशक्य होऊ लागले. आता जास्त दिवस या जगाचा संबंध राहणार नाही, हे म्हातारीने ओळखले. आपली झोपडी फुकटात कोणाला कां मिळावी असा विचार करून तिने ती एका सावकाराकडे गहाण ठेवून काही पैसे कर्जाऊ मागून घेतले. म्हातारी निघून गेल्यावर लक्ष्मण नित्याप्रमाणे कढीलिंब घेऊन बाजारात जात असता त्या सावकाराच्या घरावरून जाऊ लागला. सावकाराने त्याला हाक मारून म्हातारीने झोपडी गहाण ठेवून दोनशे रुपये कर्जाऊ मागून नेल्याचे सांगितले आणि विचारले– "यात तुझा वांटा किती?"

लक्ष्मणने विचार केला, म्हणजे म्हातारीने ही पडकी झोपडीसुद्धा कोणाला फुकटात मिळू नये यासाठी गहाण ठेवली आहे तर. परंतु हे पैसे जाणार कोठे?

रात्री म्हातारी झोपडीत झोंपे आणि लक्ष्मण बदामाच्या झाडाखाली झोपे. एकदा रात्री झोपडीत खुडबुड झालेली ऐकून तो झोपडीजवळ गेला आणि झोपडीच्या भोकातून पाहू लागला. आत एका लहानशा [illegible] उजेडात म्हातारी रुपये मोजीत [illegible]


"म्हातारे, तू मेल्यावर हे सर्व रुपये मलाच मिळणार आहेत!" असा विचार करीत लक्ष्मण परत येऊन बदामाच्या झाडाखाली झोपला.

दिवसामागून दिवस जात होते. एक दिवशी म्हातारी उठली नाही. तिला बरे वाटत नव्हते. कांबळ्यावर पडून होती. तिला वाटू लागले की आता या जगाचे नाते तुटण्याची वेळ जवळ आली आहे. तिने लक्ष्मणला हाक मारली व म्हणाली– "बेटा! मला बोलावणे आले आहे. चल आपण स्मशानात जाऊन बसून राहू या. येथेच मरण आले तर खर्च जास्त होईल."

लक्ष्मणला राग आला. म्हणाला– "तेथे गेल्यावर कमी खर्च येईल असे वाटते का आजी! लाकडे आणि कापड तर लागणारच!"

"अरे, माझे प्रेत जाळण्याची गरजच काय? फुकट इतका खर्च कशाला? कोणाला खड्डा खाणायला सांगितला तर खर्च जास्त होईल. म्हणून तू पहिल्यानेच एक खड्डा खणून ठेव आणि मी मेल्यावर माझे प्रेत ओढून या उशी कांबळ्याबरोबर खड्ड्यात टाकून वर माती टाक म्हणजे झाले." म्हातारी म्हणाली.

लक्ष्मणला वाटले की म्हातारीने जे काही वांचविले असेल ते आपल्यालाच मिळणार. म्हणून तो म्हातारीबरोबर



शानात कुदळ फावडे घेऊन निघाला. ातारी उशी व कांबळे घेऊन चालू गली. स्मशानात दोघे पोचले तेव्हां तेथे णी नव्हते. एका चिंचेच्या झाडा खाली शीवर डोके ठेवून म्हातारी पडून राहली. क्ष्मण खड्डा खणू लागला.


थोड्या वेळाने म्हातारीने विचारले– काय रे लक्ष्मणा! खड्डा खणून झाला ा?"


"आजी! खणून झाल्यावर तुम्हांला ांक मारतो." लक्ष्मण म्हणाला.

खड्डा खणून झाला तोंपर्यंत चांगले ःजाडले होते. लक्ष्मण म्हणाला–"आजी! ड्डा झाला हो तयार! पण म्हातारी काही ोललीच नाही. लक्ष्मणला वाटले, म्हातारी ली. सुटली बिचारी ती, आपण आतां ोकळे! तिचे ते सर्व आपलेच!" या वचाराने त्याला अपरंपार आनंद झाला. ्हातारीची ती घाणेरडी मळकी उशी आणि कांबळे त्याने प्रथम खड्यात टाकले आणि नंतर म्हातारीला आत पोचवून तिला पुरून [illegible] आणि तिच्या झोपडीकडे धावल[illegible]

त्याने झोंपडी हुडकून पाहिली. पण त्याला काही सांपडले नाही. सर्व जमीन खणून पाहिली आणि छपरावर गवत व ताडाची पाने होती ती उलथून पाहिली, परंतु काही एकं हाती लागले नाही. त्याला वाटले की ज्या दिवशी म्हातारीने झोंपडी गहाण टाकून रुपये आणले होते त्याच दिवशी घ्यायला पाहिजे होते. ते रुपयेदेखील आता गेले. म्हातारीचे मागच्या जन्मातले कर्ज होते की काय कोण जाणे, नाही तर इतके दिवस तिची चाकरी करून हाती काही कां आले नाही. परंतु म्हातारीने सर्व रुपये उशीत शिवून ठेवले होते हे त्याच्या लक्षात आले नाही.

उजाडण्यापूर्वी पाय काढणे त्याला आवश्यक होते. कारण त्याने झोपडी खणून काढली होती. सावकार येऊन पाहील तेव्हां तुरुंगाची पायरी चढावी लागेल असा विचार करून लक्ष्मण गाव सोडून पळून गेला.





संजय पांडवांकडे जाऊन आपले दूतकार्य पुरे झाल्यावर हस्तिनापूरला परतला. तो धृतराष्ट्राला भेटून म्हणाला–"राजा! युधिष्ठिराने सर्व दोष तुझ्यावरच लावला आहे. तूच लोकनिंदेस पात्र झाला आहेस. युधिष्ठिराने माझ्या हाती जो संदेश पाठविला आहे तो मी सर्वासमक्ष राज्यसभेत सांगेन." नंतर धृतराष्ट्राचा निरोप घेऊन संजय घरी निघून गेला. धृतराष्ट्र विदुराला बोलावून म्हणाला–"पांडवांकडून संजय परत आला आहे. तू मला माझा मनःस्ताप पुरा होईल असे काही तरी सांग."

गोडशब्दात धृतराष्ट्राची कान उघाडणी करीत म्हणाला–"राजा! तू या जगताच्या रक्षणासाठी असत्याचा त्याग कर. आपला वंशक्षय होऊ नये यासाठी इष्ट ते कर. तू दुर्योधनाच्या हट्टाला बळी पडून पांडवांना दूर लोटलेस. आतां दुर्योधनाला त्याच्या पापाची फळे कशी चाखावी लागतात हे तू स्वतःच्या डोळ्यांनीच पाहशील. म्हणून सामोपचाराने तू पांडवांना बोलावून त्यांना काही गांवे दे. अजून उशीर झाला नाही, आपल्या मुलावर ताबा ठेव. भाऊबंदकी थांबव. संकटसमयी हातभार लावायला तेच नाही का धांवणार?"

"होय रे! मी तरी पांडवांच्या हिताचाच नेहमी विचार करीत आलो. परंतु दुर्योधन समोर आला की माझे मन माझ्या ताब्यात रहात नाही. हा सर्व दैवदुर्विलास आहे." धृतराष्ट्र म्हणाला.



दुसऱ्या दिवशी राज्यसभा भरली. दुर्योधनाच्या मदतीला आलेले सर्व राजेरजवाडे संजयाने आणलेला संदेश ऐकण्यासाठी आतुर होऊन सभेला हजर होते. संजयाने सभेत आल्यावर प्रथम सर्वांना नमस्कार करून म्हणाला–"उपस्थित सभासद हो! मी पांडवांना भेटून आलो आहे. त्यांनी आपणांपैकी प्रत्येकाची फार आपुलकीने चवकशी केली होती. मी त्यांना धृतराष्ट्र महाराजांचा संदेश कळविला."

धृतराष्ट्र मध्येच म्हणाला–"संजया! तू पांडवांना माझा संदेश कळविलास. परंतु त्याचे उत्तर म्हणून इतर कोणी काय सांगायला सांगितले ते आपण नंतर ऐकू.

या [illegible]

संजय म्हणाला–"महाराज! अर्जुनाने सर्वांसमक्ष आपला संदेश सांगावा असे सांगून मला पाठविले आहे. तो म्हणाला–

"दुर्योधनादिकांनी अनेक पापे केली आहेत. त्यांनी त्या पापांबद्दल पश्चात्ताप न करतां युद्ध करण्याचे ठरविले तर त्यांना सव्याज त्या पापाची फळे चाखायला मिळतील. युधिष्ठिरदादाने आजवर स्वतःचा राग आवरून धरला आहे. परंतु जर का त्यांना राग आला तर त्यांच्या क्रोधाग्नीत सर्व कौरव भस्म होऊन जातील. एकटा भीम कौरव सैन्याचा चुराडा करण्यास समर्थ आहे. तेव्हां दुर्योधनाला पश्चात्ताप करून ही काही मिळणार नाही. नकुल, सहदेव, विराट, द्रुपद, उपपांडव, अभिमन्यू आणि मी जेव्हां कौरवांशी युद्ध करण्यास शस्त्र धारण करू तेव्हां कौरवांची जी दुर्दशा होईल ती सांगायला माझी गरज नाही. मी सर्व थोर वडीलधाऱ्या मंडळींना नमस्कार करून मग हक्काचे राज्य मिळविण्यासाठी युद्ध करीन. पंचपांडव जिवंत आहेत तोंपर्यंत कौरवांना राज्य भोगायला कसे काय मिळेल? त्यांना आमचा पराभव करतां आला तर या जगातला धर्म कायमचा नष्ट झाला असेच म्हणावे लागेल. परंतु तसे होणार नाही. कर्णाबरोबर धृतराष्ट्राच्या सर्व मुलांचा वध मी एकट्याने करणार आहे."

[illegible]

दुर्योधना! तू कर्ण, दुःशासन आणि शकुनी यांच्या नादी लागून स्वतः बिघडत चालला आहेस आणि कौरव कुळाचा नाश करीत आहेस. कौरव-पांडवांचे युद्ध होता कामा नये. नाही तरसर्वनाश निश्चित आहे."

भीष्म म्हणाले ते ऐकून कर्ण त्यांच्यावर ओरडला आणि म्हणाला–"पितामह! तुम्ही माझ्या विषयी जे काही बोललात ते दुसरा कोणी बोलला असता तर त्याचे डोके त्याच्या धडावर टिकले नसते. मी सर्वदा क्षत्रियधर्माचे पालन केले आहे. मी कधी राजद्रोह केला नाही व करणार नाही. मी एकट्याने सर्व पांडवांना यमसदनी पाठवीन. सुरवातीपासूनच ते आपले शत्रू असतां आज त्यांच्याशी मैत्री आणि सख्य कसे काय होऊ शकेल? धृतराष्ट्र महाराज आणि दुर्योधन यांस जे इष्ट असेल तेच मी करणार!"


तेव्हां भीष्म पितामह धृतराष्ट्राला म्हणाले–"धृतराष्ट्रा! कर्णाची बडबड ऐकण्याची आपल्याला पुष्कळ संवय आहे. म्हणे, एकटा सर्व पांडवांचा वध करणार आहे हा! पांडव कोठे आणि हा कोठे? पांडवांचा अपमान करणे हेच एकध्येय याच्यासमोर आहे. गोग्रहणाच्या वेळी याचे शौर्य कोठे लयास गेले होते? आणि घोषयात्रेच्या वेळी गंधर्वांनी दुर्योधनाच्या मुसक्या बांधल्या तेव्हां हा कोठे



गेला होता? पांडवांनींच दुर्योधनाला नाही का सोडविले? कर्णाच्या नुसत्या वल्गनाच ऐकून घ्याव्या. कृतीच्या नांवाने शून्य!"

द्रोणाचार्य म्हणाले–"भीष्माचार्य म्हणाले तेच करण्यात सर्वांचे हित आहे. अर्जुनाने संजयाला सांगून जे काही पाठविले आहे त्यात सत्य अधिक आहे. मी प्रथमपासूनच पांडवांशी सामोपचाराने वागावे असे सांगत आलो आहे."

भीष्माचार्य आणि द्रोणाचार्य जे म्हणाले त्यावर आपले मत देण्यापूर्वीच धृतराष्ट्राने संजयाला विचारले–"संजया! युधिष्ठिर काय म्हणाला रे?" संजयाने युधिष्ठिराच्या मदतीला कोण कोण येत आहेत हे



सांगून शेवटी युधिष्ठिर युद्धाला तयार असल्याचे सांगितले.

परंतु धृतराष्ट्राला सर्वात जास्त भीती वाटत होती ती भीमाची. कारण त्याला वाटत होते की संजयाने युधिष्ठिराच्या मदतीला कोण कोण पराक्रमी राजे आले आहेत ते सर्व एक बाजूला उभे राहिले तरी एकटा भीम त्यांच्याहून जास्त बलवान ठरेल. भीमाच्या बलपराक्रमाची कल्पना फक्त भीष्माचार्य, द्रोणाचार्य आणि कृपाचार्यांना आहे. हे तिघे नाइलाजास्तव कौरवांच्या बाजूने युद्धाला उभे राहतील हे त्याला माहीत असले तरी त्याला हेदेखील ठाऊक होते की त्यांच्या मनात पांडवांच्या


विष [illegible] नाही. म्हणून धृतराष्ट्राला कौरवांचा सर्वनाश जवळ येऊन ठेपलेला स्पष्ट दिसत होता. अर्जुनाने कधी पराभव पाहिलेलाच नव्हता. त्याच्यासमोर कोण उभा राहणार? कर्णाच्या बळावर तरी किती विश्वास करावयाचा? द्रोणाचार्य वृद्ध झाले आहेत आणि अर्जुनाचे गुरुपण आहेत. म्हणून धृतराष्ट्र सर्व गोष्टींचा विचार करून म्हणाला–"युद्ध न करणेच सर्वांच्या हिताचे आहे. आणि युद्ध झालेच तर त्यात कौरवांचा नाश निश्चित आहे. तेव्हां सर्वांची संमती असेल तर शांतिस्थापनेसाठी प्रयत्न करण्यासारखा आहे."

तेव्हां संजय म्हणाला–"राजा! या सर्व गोंधळाच्या मुळाशी तुच आहेस. कुरुजांगल प्रदेश सोडून तुझ्या राज्यातला सर्व प्रदेश पांडवांनींच जिंकून तुझ्या राज्याला जोडला आहे. परंतु तो सर्व प्रदेश तू बळकावून बसला आहेस. एवढेच नव्हे तर, तो सर्वप्रदेश तुझाच आहे असे तू मानू लागला आहेस. पांडवांच्या बलपराक्रमाची कल्पना असणारे सर्व प्रमुख वीर पांडवांच्या बाजूला गेले आहेत. तुला दुर्योधनाला आवरणे शक्य नसेल तर अनर्थच होईल." ते सर्व ऐकून घेऊन दुर्योधन आपल्या वडिलांना म्हणाला–"पण तुम्ही असे भितां कां? आमचा पराभव होईल असे तुम्हांला कां वाटते? उलट आमचा जय होईल असे [illegible] आणि [illegible] असे कृष्णाला वाटते आहे. पांडवांचा विजय नक्कीच होणार असेल तर ते भिकाऱ्यासारखे पांच गांवे कशाला मागायला आले आहेत? भीमाची भीती तुम्हांला असण्याचे कारण नाही. मी एका गदाप्रहाराने त्याचा वध करू शकेन. एकटे भीष्माचार्य पांडवांच्या सर्व सैन्याचा धुव्वा उडवून देतील. त्यांच्या मदतीला द्रोणाचार्य आणि अश्वत्थामा असल्यावर अर्जुनाचा वध करणे कठीण जाईल असे का वाटते तुम्हांला? कर्णाजवळ इंद्राने दिलेले दिव्य अस्त्र आहे. तो अर्जुनाचा वध करू शकणार नाही का? पांडवांच्या सैन्यात पांडव, धृष्टद्युम्न आणि सात्यकी हे [illegible]रे पराक्रमी वीर आहेत. त्यांच्या बरोबरीचे [illegible]द्धे आपल्या सैन्यात देखील आहेत."

त्यानंतर त्याने संजयाला विचारले–"संजय दादा! पांडवांची युद्धाची तयारी कशी काय आहे?" संजयाने कौरवांच्या कोण कोणत्या सैन्यांशी किंवा योद्ध्यांशी युद्ध करण्यास पांडवांकडे कशी तयारी झाली आहे, हे सविस्तर समजावून सांगितले.

ते ऐकून धृतराष्ट्र घाबरला व दुर्योधनाला म्हणाला–"बाळा! युद्धाचा विचार तू मनातून काढून टाक. सर्व तुला शाबासकी देतील. तुला सुखाने सर्व आयुष्य घालवायला अर्धे राज्य पुरे आहे. पांडवांना राज्याचा थोडा भाग देऊन टाक. अज्ञानाने सर्वनाशाला स्वतः बोलवू नकोस."





"मला कोणाचे काही ऐकायचे नाही. पांडवांना जिकण्यासाठी मला कोणाच्या मदतीची गरज पण नाही. फक्त कर्ण आणि दु:शासन माझ्या बाजूला असले की पुरे. आम्ही तिघे पांडवांचा पराभव करू. मी सुईच्या टोंकावर राहील एवढी जमीन देखील द्यायला तयार नाही." दुर्योधन म्हणाला.

कर्ण दुर्योधनाचे समर्थन करून म्हणाला– "मी युद्धाची सर्व जबाबदारी स्वत:वर घ्यायला तयार आहे. कोणाच्या मदतीशिवाय मी पांडवांचा वध करून दाखवितो."

तो म्हणाला ते ऐकून भीष्माचार्यांना राग आला. ते म्हणाले–"तू निव्वळ मूर्खासारखा बोलतो आहेस. अर्जुनाचा पराक्रम आणि [illegible] तू असे बोलतोस हे तुला शोभत नाही."

कर्णाला अपमान वाटला. तो भीष्माचार्यांना म्हणाला–"तुमच्या म्हणण्याप्रमाणे कृष्ण पराक्रमी आहे हे मी मान्य करतो. परंतु तुम्ही माझे फक्त दोष दाखवून माझा अपमान करतां आहां, हे मला सहन होणार नाही. मी शस्त्रसंन्यास या क्षणापासून घेत आहे. तुम्ही युद्धभूमीवर असाल तोंपर्यंत मी रणांगणावर पाऊलदेखील टाकणार नाही. तुमच्या पाठी मागून माझा पराक्रम सर्व जगाला कळेल."असे सांगून कर्ण सभेतून रागाने उठून निघून गेला.

भीष्म त्याच्याकडे पाहून व्यंग करीत दुर्योधनाला म्हणाला–"पाहिलेस, एकट्याने शत्रूचा पराभव करणारे वीर शस्त्रत्याग करून निघाले आहेत आता यांच्या बोलण्यावर कोण विश्वास ठेवणार? जयद्रथ, बाल्हिक इत्यादी वीरांसमोर त्यांच्या या वल्गना चालू शकतात म्हणा! स्वत:ला ब्राह्मणपुत्र म्हणून सांगून परशुरामाकडून अस्त्रप्राप्ती करून घेतली याने. त्याने केवढे मोठे पाप केले ते?"

ते ऐकून दुर्योधन भीष्माचार्यांनाच उलट बोलू लागला. म्हणाला–"आजोबा! पांडव तरी आमच्याच सारखे मानव आहेत. ते काय देवलोकातून उतरले आहेत? त्यांच्या सारखेच युद्धविद्येचे ज्ञान आम्ही मिळविले आहे. त्यांचे व आमचे गुरु द्रोणाचार्य एकच.



रमग पांडवांचाच जय होईल असे तरी तुम्हांला कां वाटते? मी या युद्धात कोणाच्या कृपेची अपेक्षा ठेवून उतरत नाही!"

दुर्योधनाची युद्धपिपासा वाढलेली पाहून विदुराने त्याला एक गोष्ट सांगितली. म्हणाला–"एक शिकाऱ्याने जाळे टाकले तेव्हां त्यात दोन पक्षी अडकले. परंतु ते …याले नाहीत, जाळ्यासकट आकाशात उडू लागले. त्यांचा पाठलाग करीत शिकारी जमीनवरच पळू लागला. ते पाहून एक मुनी त्याला म्हणाले–"अरे वेड्या! आकाशात ते पक्षी उडत आहेत आणि त्यांना धरायला तू जमिनीवर पळतो आहेस. काय उपयोग?" शिकाऱ्याने त्याचे काय उत्तर दिले असेलसे वाटते तुला? म्हणाला–"मुनीश्वर! ते पक्षी आपसात भांडत नाहीततोंपर्यंत माझी धडपड फुकट आहे, हे मी मानतो. परंतु त्यांचे भांडण झाले की दोघां पक्षांसकट माझे जाळे मला परत मिळेल." आणि तेच झाले. दोघं पक्षी आपसात भांडू लागले आणि जाळ्यासकट जमिनीवर येऊन पडले. शिक[illegible] त्या दोघांना [illegible] आपले जाळे परत [illegible] आनंदात घरी गेला."

ती गोष्ट सांगून विदुर दुर्योधनाला म्हणाला–"बाळा! राज्यासाठी आपल्याच बांधवांशी युद्ध केल्यास सर्वनाश होतो. म्हणून बांधवांना जोडून रहावे, तोडू नये. मी तुला अशीच आणखी एक गोष्ट सांगतो. आम्ही एकदां किरातांबरोबर गंधमादन पर्वतावर गेलो होतो. तेथे एका भयंकर दरीत एक मधमाशीचे पोळे होते. तेथले लोक सांगू लागले की त्या पोळ्यातला मध खाल्ल्याने वार्धक्य किंवा मरण येत नाही आणि आंधळ्यांना दिसू लागते. आमच्याबरोबर आलेले किरात त्या मधाच्या मोहाला बळी पडले आणि तो मिळविण्यासाठी त्या दरीत शिरले. परंतु त्या दरीत सांप होते. सर्पदंश झाल्याने त्या सर्वांना तत्काळ मरण आले. ते मधाच्या मागे धांवताना तो मिळविण्यात किती धोका आहे याचा त्यांनी विचारसुद्धा केला नाही. पांडवांशी राज्यलोभाने युद्ध करणे असेच धोक्याचे आहे."





शिव लीला

[१]

मृकंडमहर्षी हे भृगुवंशीय होते. त्यांच्या पत्नीचे नाव मरुद्वती असे होते. विवाह झाल्यावर त्यांना बराच काळ अपत्य झाले नाही. म्हणून तीर्थयात्रा करीत दोघं पतिपत्नी केदारक्षेत्री आली.

एक दिवशी दोघं केदारेश्वराची पूजा करून ध्यानमग्न बसली असतां त्यांना आकाशवाणी ऐकू आली–"आतां तुम्ही आपल्या आश्रमात परत जा. तुम्हांला अपत्यप्राप्ती होईल!"

दोघं गृहस्थाश्रमाची सर्व कर्तव्ये पुरी करीत आकाशवाणी केव्हां खरी होते याची वाट पाहू लागली. काही काळ लोटल्यावर मरुद्वतीला एक सूर्यासारखा तेजस्वी मुलगा झाला. त्याच वेळी एक आकाशवाणी झाली–"हा मुलगा अल्पायू होईल. याला बारा वर्षांचे आयुष्य प्राप्त आहे!"

ती आकाशवाणी ऐकून दोघांचा आनंद लयास गेला. दु:खाने उदास होऊन दोघं बसून राहली. परंतु पुत्रसुख जितके दिवस नशीबी असेल तितके दिवस मिळेल, पुढे 'ईश्वरेच्छा' असे मनाचे समाधान करून घेऊन दोघं मुलाचे लाड पुरविण्यात स्वत:ला विसरून गेली.

मृकंडने आपल्या मुलाचे नाव मार्कंडेय असे ठेवले. त्याचा उपनयन संस्कार यथावेळी झाला आणि त्याला गुरुगृही पाठविण्यात आले. अकरावे वर्ष लागले तेव्हांच सर्व वेदशास्त्रांचा अभ्यास संपवून मार्कंडेय घरी परत आला. ब्रह्मतेजाने तळपत असलेला त्याचा चेहरा पाहून आईबापांचे चित्त आनंदित झाले. परंतु त्यांच्या मानेवर उरलेले एक वर्ष तलवारीसारखे लटकत होते. मरुद्वती सारखी रडत बसून रहायची.

रंतु तिने मार्कंडेयाने कितीदां विचारले ारी आपल्या दु:खाचे कारण सांगितले ाही. शेवटी मृकंडने मनाचा धीर करून ार्कंडेयाला त्याचे आयुष्य एका वर्षाने ंपणार असल्याचे सांगितले.

ते ऐकून मार्कंडेयाने विचार करून काय ़रायचे ते ठरविले आणि म्हणाला—"तुम्ही ाेघे मला आशीर्वाद द्या. मी तपश्चर्येला ात आहे. शंकराला सांकडे घालून त्याच्या ृपेने मी मृत्युंजय होईन असे मला वाटते." ासे सांगून त्याने आईवडिलांच्या पायांवर ोके ठेवले. दोघांनी त्याला पोटाशी धरले ाणि "चिरंजीवी" होण्याचा आशीर्वाद दिला. त्याच वेळी नारद मुनी तेथे आले. ृकंडने त्यांची पादपूजा करून मुलाला यशप्र[illegible] आशीर्वाद [illegible] विनंती केली. [illegible] याची वाखाणणी करून त्याला आशीर्वाद दिला. म्हणाला—"बाळा मार्कंडेया! तू सरळ गौतमीच्या काठावर जा आणि पंचाक्षरी मंत्राचा जप करीत शंकराची आराधना कर. तुझा मनोरथ पूर्ण होईल."

मार्कंडेयाने गौतमीनदीकाठी जाऊन सैकत-लिंगाची प्रतिष्ठा केली आणि म्हणाला—"हे चंद्रशेखरा! तुझ्याशिवाय माझे रक्षण कोण करणार? तुझ्या चरणी लीन झालेल्या भक्ता-वर यमाची वक्रदृष्टी पडणे शक्यच नाही."

तिकडे नारदमुनी त्रिलोकात संचार करीत यमलोकी गेले आणि यमाला म्हणाले—"मृत्यूवर जय मिळविण्याची प्रतीक्षा करून [illegible] आहे. आता तुझ्या बळाची परीक्षा आहे." असे सांगून नारदमुनी निघून गेले.

एक वर्ष संपत आले आणि मार्कंडेयाच्या आयुष्यातला शेवटचा दिवस उजाडला. यमाने आपले दूत पाठविले. परंतु यमदूत मार्कंडेयाच्या तेजामुळे जवळ जाऊंच शकले नाहीत. ते परतले तेव्हां यमाला स्वत: जावे लागले. तो आपला दंड आणि पाश घेऊन महिषवाहनावर बसून निघाला.

मार्कंडेय शिवलिंगाला आलिंगन करून व त्यावर मस्तक ठेवून ध्यान मग्न बसला होता. त्यावेळी यमाने आपला पाश त्याच्या शिवलिंगासह मार्कंडेयाच्या गळ्यात पडला. तेव्हां एकदम शंकर रुद्ररूपाने प्रगट झाला आणि त्याने आपला तिसरा डोळा उघडून यमावर त्रिशूलाचा नेम धरला. यम शंकराचे ते रुद्ररूप पाहून थरथर कांपू लागला आणि ओरडला—"हरहर शंभो, महादेव! त्राहि माम्!" आणि बेशुद्ध होऊन पडला.

शंकराने आपला अभयहस्त मार्कंडेयाच्या मस्तकावर ठेवला आणि त्याला आशीर्वाद देऊन म्हणाला—"वत्स! तू मृत्युंजय आहेस. कल्पकल्पांतरपर्यंत तू चिरंजीवी राहशील."

त्यानंतर देवांनी येऊन शंकराला हात जोडून विनंती केली की यमाचा उद्धार करावा, नाहींतर जन्म मृत्यूचे चक्र बंद पडेल. शंकराच्या अनुग्रहाने यम उठून बसला. शंकराला नमस्कार करून तो यमलोकी परत गेला.





त्याच वेळी आपल्या मुलाला भेटायला म्हणून मृकंड व मरुद्वती आले. शिवकृपेने मार्कंडेय चिरंजीव झाल्याचे कळल्यावर त्यांना परमानंद झाला. 'शिव लीला अगाध आहे' असे म्हणत दोघं आपल्या मुलाला घेऊन आपल्या आश्रमात परत आले.

त्यानंतर मार्कंडेय चिरकाल जीवित राहिला. त्याच्याहून जास्त दीर्घायु असे अनेक थोर पुरुष पूर्वी होऊन गेले होते.

इंद्रद्युम्न नामक राजाला फार मोठी कीर्ती मिळाली होती त्या कीर्तीच्या आधारे त्याला स्वर्गसुख प्राप्त झाले होते. परंतु त्याची कीर्ती संपली. त्यानंतर स्वर्गलोकांतील निवासी त्याला म्हणाले–"भूलोकात कोणी तुझी आठवण देखील काढीत नाही. "आतां स्वर्गात तुला रहायला जागा नाही. तू भूलोकात परत जा."

इंद्रद्युम्न भूलोकीं परत आला आणि त्याचे नाव म्हणजे कीर्ती शेष आहे का चवकशी करीत फिरू लागला. तो मार्कंडेयाकडे आला. तेव्हां मार्कंडेय त्याला म्हणाला–"हे [illegible] मोठा प्रावारकर्ण (घुबड) आहे, त्याला जाऊन विचार."

त्यानंतर दोघे प्रावारकर्णाकडे आले. तो म्हणाला–"तू कोण हे मला माहीत नाही, परंतु माझ्याहून मोठा नालीकजंघ आहे. चल त्याच्याकडे, त्याला विचारून पाहू या."

नालीकजंघला देखील इंद्रद्युम्न कोण हे माहीत नव्हते. परंतु तो त्याच्याहून वयाने मोठे आकूपार नांवाचे जे कांसव होते त्याच्याकडे तिघांना बरोबर घेऊन निघाला.

आकूपारने इंद्रद्युम्नाला पाहतांच ओळखले व म्हणाला–"मी चांगला ओळखतो. तू कित्येकदां माझे रक्षण केले आहेस. मी ज्या सरोवरात राहतो ते कसे झाले ठाऊक आहे का तुला? तू अनेक यज्ञ करून गोदाने केलीस. त्या गाईंच्या खुरानी येथे एक सरोवर झाले."

तेव्हां देवदूत इंद्रद्युम्नाची कीर्ती अजून इहलोकांत शेष आहे हे स्वतः पाहून त्याला स्वर्गलोकी पुनरपि घेऊन गेले.



१३३. "अल्बट्रास" पक्षी

दक्षिण अमेरिकेच्या दक्षिणेकडील टोकापासून सुमारे १२०० मैल पूर्वेकडे अॅटलांटिक समुद्राच्या अत्यंत थंड समुद्री प्रदेशात दक्षिण जॉर्जिया नांवाच्या बेटांच्या रांगेत अल्बट्रास नामक एक लहानसे बेट आहे. त्या बेटावर 'अल्बट्रास' नामक पक्षी राहतात. ते पक्षी पाण्याच्या आश्रयालाच वाढतात. ते फार मोठे पक्षी आहेत. त्यांनी पंख पसरले म्हणजे त्या पक्ष्यांची लांबी ११ फुटापर्यंत होते. वारा नसेल तर पक्ष्यांना उडता येत नाही आणि आकाशातून खाली उतरतांपण येत नाही. वारा सुद्धा सोसाट्याचा असतो. या चित्रात अल्बट्रास पक्ष्यांचा एक जोडा आहे.

